



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. २७ फेब्रुवारी २०२४ । वर्ष : २२ वे अंक : १४९ वा किंमत : ५ रुपये पाने ८

### भारताने कसोटी मालिका जिंकली...



**रांची :** चौथ्या कसोटी सामन्यात भारताने इंग्लंडला धुळ चारत दणदणीत विजय साकारला. या विजयासह भारताने कसोटी मालिकाही जिंकली आहे. कारण पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारताने हा सलग तिसरा विजय मिळवला आहे. त्यामुळे भारताने या मालिकेत ३-१ अशी विजयी आघाडी घेतली आहे. इंग्लंडने भारतापुढे विजयासाठी १९२ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना रोहितने अर्धशतक झळकावले. संघाच्या विजयाचा मार्ग प्रशस्त केला. पण त्याला विजयावर शिक्कामोर्तब करता आले नाही. पण भारताच्या शुभमन गिलने ही जबाबदारी चोख पार पाडली आणि भारताला पाच विकेट्स राखून विजय मिळवून दिला.

# चिमुरड्याची गळा चिरून हत्या

## माढा तालुक्यातील कव्हे गावात निराश मातेचा आत्महत्येचा प्रयत्न

सुराज्य/कुर्डूवाडी

**सहावर्षीय पोटच्या गोळ्याच्या गळ्यावरच कुऱ्हाडीने घालून त्याचे दोन तुकडे केले आणि स्वत:ही तणनाशक औषध पिऊन आत्महत्येचा प्रयत्न करण्याची धक्कादायक घटना सोमवारी सकाळी ९.३० ते दुपारी १२.३० च्या दरम्यान घडली कुर्डुवाडी करमाळामामार्गवरील कव्हे येथील महादेववाडी ते कव्हे पालखी मार्गावरील बोगद्याजवळील राहत्या घरी घडली. या घटनेने एकच खळबळ उडाली असून नागरिक चर्चेत तर्कवितर्क लढवत आहेत.**

दरम्यान, कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात या महिलेचे सासरे नारायण जगन्नाथ चोपडे, (वय ५७ रा. कव्हे ता. माढा) यांनी फिर्याद दिली. तर प्रणव गणेश चोपडे (वय ६) असे मृत मुलाचे नाव आहे.



दुर्दैवी : प्रणव चोपडे

चोपडे कुटुंबियांनी सोमावारी (दि. २६) सकाळी साडे नऊच्या सुमारास एकत्र जेवण केले. त्यानंतर सासरे नारायण आपली पत्नी पार्वती यांच्यासहधाराशिव जिल्ह्यातील परांडा तालुक्यात मौजे पिंपळगाव येथे नातेवाईकांच्या लग्नासाठी गेले होते. त्यावेळी दुपारी साडेबाराच्या सुमारास सून कौशल्या उर्फ कोमल हींवा सासऱ्यांना फोन आला. फोनवर रडत रडतच तीने मुलांना घरी लवकर येण्यास सांगितले. त्यावेळी काय झाले असे विचारता ती रडू लागली. त्यांनी नातू प्रणवला फोन देण्यास सांगितले. त्यावेळी मी त्याला घरातच छाटले आहे. असे कौशल्या हिने सांगितले. त्यानंतर तीने फोन कट केला.

नारायण यांनी आपला मुलगा गणेश आणि कौशल्या यांचा भाऊ नवनाथ जगताप यांना तातडीने घरी जाण्यास सांगितले. दोघांनी घराकडे धाव घेतली. त्यावेळी गणेश याने फोन करून किटकनाशक पिऊन कौशल्या घरापुढे लोळत आहे, असे सांगितले. त्यांनी आत जाऊन पाहताच चिमुरड्या प्रणवचा मृतदेह दिसला. त्यानंतर ते हबकून गेले. दरम्यान घराजवळ आलेल्या नवनाथ यांनी कौशल्या यांना घेऊन खासगी रुग्णालयात दाखल केले.

नारायण यांना मुलगा गणेशचा फोन आला. त्याने कौशल्या हिला दवाखान्यात नेले असून मीही दवाखान्यात जात असल्याचे सांगितले . याच दरम्यान, पुतण्या सतिश चोपडे यांना फोन केला. त्यावेळी त्यांनी प्रणवचे काही सांगू शकत नाही. त्याला कुऱ्हाडीने वार करून ठार मारले आहे, असे सांगितले. सून कौशल्या हीने नातू प्रणव यास कु-हाडने अज्ञात कारणावरून जीवे ठार मारून स्वत: ही आत्महत्या करण्यासाठी घरात असलेले तणनाशक हे विषारी औषध पिली आहे. सासरे नारायण जगन्नाथ चोपडे यांच्या फिर्यादीवरुन सून कौशल्या हिचेवर गुन्हा दाखल झाला आहे.

### आई क्रुर का झाली?

कौशल्या हिचे यापुर्वीचे वर्तन सरळ होते. तीबने असे टोकाचे पाऊल का उचलले असावे याबाबत आश्चर्य आणि साशंकता व्यक्त होत आहे. एक आई एवढी क्रुर कशी होऊ शकते आणि त्याचे कारण तरी काय असावे?याबाबत उलट सुलट चर्चा सुरू आहे.

# जि.प. कार्यालयीन कामकाजाचा फज्जा

## सांस्कृतिक कार्यक्रमात अधिकाऱ्यांचे मै हू डॉन! नागरीक म्हणाले, मी का लहान!

सोलापूर/बळीराम सर्वगोड





जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने मागील दोन दिवसापासून कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या विविध प्रकारच्या सांस्कृतिक क्रीडा स्पर्धा सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने घेतल्या जात आहेत त्यामुळे जिल्हा परिषद प्रशासनाच्या कार्यालयीन कामकाजाचा फज्जा उडाला असून या सांस्कृतिक क्रीडा स्पर्धेकरिता लाखो रुपयांची उधळण झाली असल्याने जिल्हा परिषदेच्या आवारात एकच मोठी चर्चा होत आहे.

जिल्हा परिषद म्हणजे जिल्ह्याचे मंत्रालय. त्यामुळे अनेक कामांसाठी जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून शेकडो नागरिक तेथे येत असतात. त्या नागरिकांच्या कामाचा निपटारा या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या गलबल्यात होऊ शकला नाही. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांपासून सर्व प्रमुख अधिकारीच या सांस्कृतिक महोत्सवात अडकल्याने सामान्य माणसांच्या कामाला वालीच नव्हता. रिकाम्या टेबलांनीच जिल्हाभरातून आलेल्या नागरिकांचे स्वागत झाले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उदघाटन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांचे हस्ते करण्यात आले. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन) स्मिता पाटील ,मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, सांस्कृतिक समितीचे प्रमुख तथा जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अमोल जाधव, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनिल खमितकर, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, नरेंद्र खराडे, सुनिल कटकधोंड, कृषी अधिकारी वाघमोडे यांचेसह सर्व विभाग प्रमुख तसेच नाट्य परिषदेचे प्रशांत बडवे आदींच्या उपस्थितीत या दमदार कार्यक्रमास सुरूवात झाली आहे.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सहाय्यक प्रशासन अधिकारी विवेक लिंगराज यांनी केले. म्हणजेच जवळपास मुख्य असे सारे अधिकारी या कार्यक्रमात व्यस्त होते. सामन्य नागरिकामच्या तक्रारींचे निवारण करण्यापेक्षा हा कार्यक्रमच आज चर्चेचा विषय ठरला. कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांच्या मै हू डॉन..! , जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांच्या आरंभ प्रचंड है व कार्यकारी अधिकारी नरेंद्र खराडे यांच्या मेरी स्वप्नो कि राणी या गितावर एकसाथ कर्मचारी व सर्व विभाग प्रमुख यांची पाऊले थिरकली! त्यांच्या गाण्यावर थिरकणाऱ्या एकाही कर्मचाऱ्याला आपल्या कामाची आठवण येऊ नये, किंबहुना तशी आठवण कोण्याही वरीष्ठांनी न देणे ही असंवेदनशीलता असल्याचे काही कर्मचाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर मान्य केले.

### विरंगुळा आवश्यकच!

प्रशासन म्हणते कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना एक-दोन दिवसाचा विरंगुळा मिळाल्याने मन प्रफुल्लित होते. काम करण्यात लक्ष लागते विशेष बाब म्हणजे मनातील सर्व प्रकारचे टेन्शन कमी होते त्यामुळे अशा प्रकारच्या स्पर्धा घेणे जरुरीचे असल्याचे मत जिल्हा प्रशासनाच्या मनीषा आव्हाळे यांनी व्यक्त केले. तब्बल तीन दिवस कार्यालयीन कामकाजाचा खोळंबा झाला आहे त्यामुळे ग्रामीण भागातील विकासाची कामे ठप्प झाली आहेत ग्रामीण भागातून येणाऱ्या लाभार्थ्यांचे अतोनात आर्थिक नुकसान झालेले तसेच या स्पर्धेत पोटी लाखो रुपयांचा जिल्हा परिषद शेष फंडातून खर्च झालेला आहे, याकडे जाणकार लक्ष वेधत आहेत.

# सरकार ॲक्शन मोडमध्ये, मनोज जरांगेवर गुन्हा दाखल

**मुंबई :** मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर एकेरी आणि खालच्या भाषेत टीका केल्यानंतर आतापर्यंत सबुरीचे धोरण बाळगत असलेले राज्य सरकार ॲक्शन मोडमध्ये आले आहे. यापूर्वी पोलिसांकडून मराठा आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. परंतु, सोमवारी पहिल्यांदाच पोलिसांकडून थेट मनोज जरांगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

कालपासून राज्य सरकारकडून जवळपास १०४१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यापैकी ४२५ गुन्हे मराठवाड्यात दाखल करण्यात आले आहेत. तर बीड जिल्ह्यातील शिरुर आणि अमळनेरमध्ये मनोज जरांगे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रास्ता रोकोसाठी लोकांना प्रवृत्त केल्याप्रकरणी पोलिसांनी जरांगे यांच्यावर गुन्हा दाखल केल्याचे समजते.

### समाजाने शांततेची भूमिका घ्यावी

रविवारी मुंबईला निघालेले मनोज जरांगे आंतरवाली सराटी येथे पुन्हा परतले. त्यांनी मराठा आंदोलकांना आपापल्या गावांमध्ये परतण्याचं आवाहन केलं. आम्हाला कायद्याचं पालन करायचं आहे, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. अंबडमध्ये संचारबंदी लावण्यात आल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी मागे फिरण्याचा निर्णय घेतला. शहाणी भूमिका घेऊन परत जातो आहे, असंही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. मनोज जरांगे यांनी भंबेरी गावातून आंतरवाली सराटीमध्ये परतले आहे. महाराष्ट्रातल्या मराठा समाजाने शांत रहावं, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

## भाजपच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय



### भाजप आमदारांच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन राज्यातील वातावरण पुन्हा एकदा तापण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर सोमवारी मुंबईत भाजप आमदारांची बैठक पार पडली. यावेळी भाजप आमदारांना महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या. आपण मराठा समाजाच्या पाठिशी आहोत, ही बाब आपापल्या मतदारसंघात जाऊन सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवा. मनोज जरांगे पाटील वैयक्तिक स्वार्थासाठी राजकीय भाषा बोलत आहेत. मराठा आरक्षणाचा मुद्दा संयमाने हाताळला पाहिजे. भाजप मराठा समाजाच्या पाठिशी राहणार आहे. यापूर्वीही भाजप सरकारनेच मराठा समाजाला दिलेले आरक्षण उच्च न्यायालयात टिकवले. आतादेखील नव्याने दिलेले आरक्षण कोर्टात टिकेल, हा विश्वास लोकांना द्या, अशी सूचना भाजप आमदारांना करण्यात आली आहे.

### मनोज जरांगे यांचे उपोषण स्थगित

मनोज जरांगे पाटील यांनी सोमवारी दुपारी आमरण उपोषण स्थगित करत असल्याची घोषणा केली. त्याचे रुपांतर साखळी उपोषणात करणार असल्याचे त्यांनी सांगितले. मनोज जरांगे आता पुढील एक-दोन दिवस उपचार घेऊन मराठा बांधवांच्या भेटीसाठी गावागावात फिरणार आहेत. यावेळी मनोज जरांगे यांच्या दौऱ्यांना मराठा बांधवांचा पूर्वीप्रमाणेच प्रतिसाद मिळणार का, हे आता पाहावे लागेल. राज्य सरकारकडून मराठा आंदोलन चिघळू नये, यादृष्टीने खबरदारीची पावले उचलली आहेत. त्यासाठी मराठवाड्यातील तीन जिल्ह्यांमध्ये इंटरनेट सेवा खंडित करण्यात आली आहे.

### जालन्यातील अंबड तालुक्यात कर्फ्यू, तीन जिल्ह्यातील इंटरनेट सेवा बंद



मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याविरोधात आक्रमक भूमिका घेतल्यानंतर पुन्हा एकदा मराठा आरक्षण आंदोलन पेटले आहे. जालन्याच्या अंबडमध्ये संचारबंदी लागू करण्यात आली आहे. आज सकाळी अंबडमध्ये मराठा आंदोलकांनी एसटी बस पेटवून दिल्यानंतर तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. याशिवाय सरकारने मराठवाड्यातील बीड, जालना आणि छत्रपती संभाजीनगर या तीन जिल्ह्यातील इंटरनेट सेवा खंडीत केली आहे. जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी येथे मराठा आंदोलक मोठ्या प्रमाणात गोळा होण्यास कालपासून सुरुवात झाली आहे. मनोज जरांगे यांनी मुंबईला जाऊ नये, यासाठी आंदोलक उपोषण करणार आहेत. आंदोलक मोठ्या प्रमाणात जमू नयेत यासाठी पोलीस प्रशासनाने तीनही जिल्ह्यांच्या सीमा बंद केल्या आहेत.

# माथाडींचा हलगीनाद मोर्चा!

सुराज्य/सोलापूर




सोलापूर जिल्हा हमाल मापाडी माथाडी श्रमजीवी कामगार समन्वय समितीच्या वतीने कामगारांच्या विविध मागण्यासाठी चार हुतात्मा चौका ते जिल्हापरिषद या मार्गे हलगीनाद मोर्चा काढत जिल्हापरिषद पूनम गेट समोर सोमवार दिनांक २६ रोजी सकाळी ११ वाजता धरणे आंदोलन करण्यात आले.

हमाल आणि कष्टकरी कामगारांना कामाची हमी असणारा माथाडी कायदा यामध्ये बदल व कायदाच बंद करणाऱ्या, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हमालांवरील अन्याय, माथाडी कामगारांच्या पाल्यानां माथाडी मंडळात नोकरी द्यावी, शासकीय गोदामातील सर्व कामे माथाडीना मिळावी,गोदामातील माथाडी कामगारांची थकबाकी व महागाई निर्देशांक रक्कम मंडळात जमा करणे, सर्व महिला कामगारांची माथाडी बोर्डात नोंद करा, महामंडळ स्थापना करा, कलम ३४ रद्द करा आदी मागण्यासाठी आझाद मैदान मुंबई येथे बाबा आढाव, नरेंद्र पाटील यांच्या नेतृत्वामध्ये संघटनेचे वतीने उपोषण सुरु असून त्या अनुषंगाने आज धरणे आंदोलन करण्यात आले आहे असे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव शिंदे यांनी दिली.

माथाडी कामगारांच्या मागण्या मान्य नाही झाल्यास शासकीय गोदाम, रेल्वे मालधक्का,मार्केट समिती सर्व भुसार बंद ठेवण्यात येतील असा इशारा श्री शिंदे यांनी यावेळी दिला.

# सराईत गुन्हेगार सचिन माने दोन वर्षांकरिता तडीपार

**सोलापूर :** विजापूर नाका व एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार सचिन नागनाथ माने (वय २५ रा. साई नगर, साखर कारखान्याजवळ) याला सोलापूर व धाराशीव या दोन जिल्ह्यांमधून दोन वर्षांकरिता तडीपार करण्यात आले आहे.




आगामी काळात विविध जाती-धर्मांचे सण-उत्सव मिरवणुका व लोकसभा सार्वत्रिक निवडणुकिच्या अनुषंगाने सोलापूर शहर व परिसरात कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये म्हणून विजापूर नाका व एमआयडीसी पोलीस स्टेशन हद्दीतील सराईत गुन्हेगार सचिन माने याच्यावर ही कारवाई करण्यात आली. सचिन माने याला दि. २५ फेब्रुवारी २०२४ रोजी विजापूर नाका पोलीस स्टेशन कडून ताब्यात घेवून सोलापूर व धाराशीव या दोन जिल्ह्यातून दोन वर्षांकरिता तडीपार करण्यात आले आहे.

पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त अजय परमार, विजापूर नाका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शहाजी पवार, दुपोनि उमाकांत शिंदे, फौजदार मुकेश गायकवाड, पोलीस कॉन्स्टेबल रमेश कोर्से गांव यांनी पार पाडली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



या डिजीटल युगातही चिठ्ठीची आठवण येते !

कल्याण
779-32-390

मुंबई
249-50-190

# गझल उदास झाली...

## गझलकार पंकज उधास यांचे ७२ व्या वर्षी निधन

सुराज्य/मुंबई

चिठ्ठी आयी है वतनसे चिठ्ठी आयी है, चांदी जैसा रंग तेरा या सारख्या सुरेल गझलांनी रसिकमनांवर गारूड करणारे ज्येष्ठ गझल गायक पंकज उधास यांचे सोमवारी निधन झाले. त्यांनी वयाच्या ७२ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला.

उधास यांना कर्करोग झाल्याचे निदान काही महिन्यांपूर्वी झाले होते आणि ते कोणालाही भेटत नव्हते. त्यांच्या कुटुंबियांनी एका निवेदनाद्वारे ही माहिती दिली. पंकज उधास यांच्यावर मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरू होते. आज सकाळी ११ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली

पंकज उधास यांनी सिनेसृष्टी आणि संगीताची त्यांनी प्रदीर्घ काळ सेवा केली. त्यांच्या गझल, त्यांची अनेक गाणी चाहत्यांमध्ये प्रचंड लोकप्रिय होती. त्यांचं 'चिठ्ठी आई है' या गाण्याने तर अनेकांच्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. आज स्वरसम्राट हरपला अशी भावना प्रेक्षक वर्गातून व्यक्त केली जात आहे. त्यांची 'ना कजरे की धार', 'चांदी जैसा रंग', 'एक तराफा उसका घर', 'मैं नशे मे हू', 'मैं पिता नही हू' यांसारखी अनेक गाणी प्रेक्षकांमध्ये लोकप्रिय होती.

१९८० मध्ये आहत नावाच्या अल्बमच्या मार्फत त्यांनी आपल्या यशस्वी कारकीर्दीची सुरुवात केली. या अल्बमने त्यांना व्यावसायिक यशाचे दरवाजे खुले झाले.

### चांगला मित्र गमावला : सुरेश वाडकर

पंकज उधास यांनी आपल्या गझलने समस्त दुनियेला आनंद दिला. ते आपल्यातून गेले, ही धक्कादायक बातमी आहे. पंकज उधास यांचं जाणं फारच वाईट झालं, त्यांच्या कुटुंबाबत विचार करुन माझ्या अंगावर काटा येतोय. पंकज उधास यांच्या खजाना या अल्बमचं पुन्हा येणार होते. माझ्या शाळेत त्याच्या रिहर्सल्स सुरु होत्या. पंकज उधास उच्चशिक्षित होता, इतका मोठा गाणारा माणूस, चांगला मित्र आज आम्ही गमावला. त्यांच्या कुटुंबीयांना इतका मोठा धक्का पचवण्याची शक्ती इश्वर देवो, ही प्रार्थना अशा शब्दात ज्येष्ठ गायक सुरेश वाडकर यांनी शोक व्यक्त केला.

### गझलचे मोठे नुकसान : पांचाळे

पंकज उधास यांचं जाणं हे गझलचं मोठं नुकसान आहे. आमच्या कमी भेटी झाल्या, पण त्या लक्षात राहणाऱ्या होत्या. खूप मोठा माणूस होता. अतिशय साधा आणि संवादी पद्धतीने गझल सादर करत होते. त्यांच्या गायकीची वेगळी पद्धत निर्माण झाली होती, ती अतिशय लोकप्रिय होती. त्यांच्या जाण्याने पोकळी निर्माण झाली. अशी प्रतिक्रिया गझल नवाज पांचाळे यांनी दिली.



१९५१-२०२४

# सूत जुळले...

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या विरोधात स्थापन झालेल्या इंडिया आघाडी मोडून पडणार की काय? असे चित्र काही दिवसांपूर्वी तयार झाले होते. कारण इंडियामधून एकेक घटक पक्ष बाहेर पडले होते. पण तसे नाही. इंडिया अधिक मजबूत होताना दिसत आहे. आम आदमी पार्टीने काँग्रेसशी आघाडी कायम ठेवली व दिल्लीत जागा वाटपांवर समझोताही झाला. उत्तर प्रदेशमध्ये तब्बल सात वर्षांनंतर काँग्रेस आणि समाजवादी हे दोनही पक्ष एकत्र आले आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये काँग्रेस आणि समाजवादी पक्षात जागावाटपावर अनेक मतमतांतरे पाहायला मिळाली. परंतु, अखेर काँग्रेस आणि सपा यांच्या जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला. आगामी लोकसभा निवडणुकीत काँग्रेस १७, तर सपा ६३ जागांवर निवडणूक लढवणार आहे. जागावाटपावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर चार दिवसांनी समाजवादी पक्षप्रमुख अखिलेश यादव रविवारी आग्रा येथील राहुल गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेत सहभागी झाले. दोन्ही नेत्यांनी केंद्र आणि राज्यातील भाजपा सरकारवर निशाणा साधला. २०१७ मध्येही काँग्रेस आणि समाजवादी पक्षाने युती केली होती. मात्र, या युतीचा फारसा फायदा दोघांनाही झाला नाही. यंदाच्या निवडणुकांमध्ये २०१७ ची पुनरावृत्ती होईल की नवा इतिहास घडणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. सात वर्षांनंतर अखिलेश यादव आणि राहुल गांधी रविवारी आग्रा येथे काँग्रेसच्या भारत जोडो न्याय यात्रेत पुन्हा एकत्र आले. राहुल गांधी, काँग्रेस सरचिटणीस प्रियांका गांधी वाड्रा आणि सपा अध्यक्ष अखिलेश यादव एकत्र आल्याने २०१७ च्या आठवणींना उजाळा मिळाला.



२०१७ च्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी या तिघांनीही विजय रथातून प्रचार केला होता. दोन्ही पक्षांतील नेते यंदाच्या निवडणुकीत २०१७ ची पुनरावृत्ती होणार नाही, अशी आशा व्यक्त करत आहेत. २०१७ च्या निवडणुकीतील परिणामाने दोन्ही पक्षांना धक्का बसला होता. उत्तर प्रदेशमधील २०१७ च्या विधानसभा निवडणुकीत सपाने केवळ ४७ जागा जिंकल्या होत्या. २०१२ मध्ये २२४ जागा जिंकून सत्तेवर आलेल्या सपासाठी हा खूप मोठा धक्का होता, तर काँग्रेसने या निवडणुकीत केवळ सात जागा जिंकल्या. २०१२ च्या निवडणुकीत हा आकडा २८ होता. २०१७ आणि २०२३-२४ मध्ये युतीची चर्चा निवडणुकीच्या काही महिने आधी सुरू झाली. यादरम्यान दोन्ही पक्षांच्या संबंधांमध्ये अनेक चढ-उतार आलेत. अखेर पक्षश्रेष्ठींनी यात हस्तक्षेप करून पक्षापक्षातील मतभेद दूर केले. २०१७ मध्ये दोन्ही पक्षांचे एकमत होण्यासाठी वेळ लागला. या निवडणुकीत काँग्रेसने ११० जागांची मागणी केली, तर सपाने १०० जागा देऊ केल्या. यावेळीही सोनिया गांधी, गुलाम नबी आझाद यांसारख्या काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी युती स्थापन व्हावी यासाठी पुढाकार घेतला. प्रियांका यांनी अखिलेश आणि सपा नेते आझम खान यांची भेट घेतली. या बैठकीनंतर, विधानसभेसाठी सपा २९८ जागा लढवणार असल्याची घोषणा केली, तर काँग्रेसने १०५ मतदारसंघात आपले उमेदवार उभे केले. घोषणेच्या काही दिवसांनंतर सपाने २०८ उमेदवारांची यादी जाहीर केली. यात काँग्रेसला दिलेल्या १० जागांवरही सपाने आपले उमेदवार उभे केले.यंदा जानेवारीपासून काँग्रेसची राष्ट्रीय आघाडी समिती आणि सपाची समन्वय समिती यांच्यात जागावाटपासाठी बैठक घेण्यात आल्या. २०१९ च्या निवडणुकीत सपाने जिंकलेल्या रामपूर आणि मुरादाबादसह लोकसभेच्या २८ जागांची मागणी काँग्रेसने केली होती. सपाने वाराणसी आणि अमरोहा येथे आपले उमेदवार उभे केले. पूर्वी सपाने या दोन्ही जागा काँग्रेसला देणार असल्याचे आश्वासन दिले होते. २०१७ मध्ये जे घडले तसेच काहीसे पुन्हा घडत होते. भाजपा हटाओ, देश को बचाओ (भाजपाला हटवा, देशाला वाचवा), असे अखिलेश यादव यांनी आग्रा येथे भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान सांगितले. यावेळी उत्तर प्रदेशमधील सर्व ८० लोकसभा जागांवर सत्ताधारी पक्षाचा पराभव करण्याचे आवाहनही त्यांनी केले. अखिलेश यांनी हातात हात दिल्याने काँग्रेसचे बळ वाढेल, यात शंका नाही. कारण यूपीच्या विजयातूनच पंतप्रधान ठरत असतो. अखिलेश यांनी पुन्हा दोस्तीचा हात पुढे केल्याने नेहमीच्या तणावात असणाऱ्या राहुल यांच्या चेहऱ्यावर हास्य फुटणे साहजिकच आहे. या दोघांच्या आघाडीने भाजप नेत्यांच्या भुवया नक्कीच उंचावल्या असतील.

साहित्य

# मराठीत जगा आणि मराठीतच वागा!

दरवर्षी २७ फेब्रुवारीला कवी वि. वा. शिरवाडकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने मराठी भाषा दिन राज्यात सर्वत्र उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी आणि या दिवसाच्या निमित्ताने सर्वत्र मराठीचा बोलबाला असतो, मराठी भाषेला अद्याप अभिजात भाषेचा दर्जा का नाही या विषयावर चर्चा रंगतात, मराठीत स्वाक्षरी करण्याच्या मोहिमा राबवल्या जातात, मराठी बोलण्याचा अट्टाहास केला जातो, मराठी पाट्यांचा प्रश्न ऐरणीवर येतो, मराठीतून शुभेच्छा देण्याचे आवाहन केले जाते. मात्र हा दिवस सरला की पुढे वर्षभर कोणी मराठीविषयी काहीच बोलताना दिसत नाही, त्यामुळे मराठी भाषाभिमानही अन्य 'डेज'प्रमाणे केवळ एक दिवसापुरता सीमित राहिला आहे. मराठी भाषा बोलणारे देशभरात सुमारे साडे आठ कोटी तर भारताबाहेर अडीच कोटींहून अधिक लोक आहेत. भारतात चौथ्या क्रमांकाची तर जगात दहाव्या क्रमांकाची भाषा असलेली मराठी भाषा ही अद्याप अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त करू शकली नाही हे राज्यात होऊन गेलेल्या राज्यकर्त्यांचे सर्वात मोठे अपयश म्हणावे लागेल. कोणत्याही भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी जे निकष पूर्ण करावे लागतात त्याबाबतीत मराठी भाषा ही सर्वात उजवी आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. राज्य आणि केंद्रात सरकारे बदलली, नव्याने विराजमान झालेल्या मुख्यमंत्र्यांनी आणि सांस्कृतिक मंत्र्यांनी 'आम्ही मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून देऊ' अशी आश्वासनेही दिली; मात्र ही आश्वासने अन्य आश्वासनांप्रमाणे हवेतच विरली. अर्थात प्रत्येक मुख्यमंत्र्यांनी आपल्या काळात यासंदर्भात थोडेबहुत प्रयत्न केलेसुद्धा: मात्र दक्षिणेकडील राज्यांनी त्यांच्या राज्यांतील भाषांना अभिजात दर्जा मिळण्यासाठी ज्या प्रमाणात पाठपुरावा केला त्याबाबतीत आपण कमी पडलो हेही सत्य मान्य करावे लागेल. केंद्राने आजपर्यंत तमिळ, संस्कृत, तेलुगू, कन्नड, मल्याळम, उडिया या सहा भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी पृथ्वीराज चौहान मुख्यमंत्री असताना महाराष्ट्र सरकारने ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून, सुमारे ५०० पानांचा अहवाल केंद्र सरकारला दिला आहे. तरीही अभिजात भाषेचे घोडे पुढे सरकलेले नाही. मागील अनेक वर्षांपासून केंद्राला सर्वाधिक कर महाराष्ट्रातून मिळतो तरीही महाराष्ट्राची मायबोली असलेल्या मराठीला केंद्राकडून सापत्न वागणूक का मिळत आहे हा प्रश्न सर्वांनाच पडला आहे. मराठी केवळ महाराष्ट्राची भाषा आहे असेही नव्हे. गोवा, दादरा, नगर, हवेली, दमण, दीव या राज्यांतही अधिक लोकसंख्या मराठी भाषिकांचीच आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यावर मराठीचा अभ्यास, संशोधन, साहित्यसंग्रह यांना गती मिळेल. भारतातील ४५० हून अधिक विद्यापीठांत मराठी भाषेकरिता अध्यासन केंद्र स्थापन केले जातील. मराठीतील प्रज्ञावंतांना दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार मिळतील, मराठीतील प्राचीन ग्रंथ अनुवादित होतील. महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळ सशक्त होईल. १२ हजारांहून अधिक ग्रंथालयांना संजीवनी मिळेल, वाचनसंस्कृती वाढेल, मराठी भाषेसाठी काम करणाऱ्या संस्था-विद्यार्थ्यांना भरीव साहाय्य करणे शक्य होईल. सध्या केंद्रात आणि राज्यात दोन्हीकडे एकाच पक्षाचे सरकार आहे त्यामुळे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळायलाच हवा अशी सामान्य मराठी जणांची तरी अपेक्षा आहे.

आज मराठी भाषेला महाराष्ट्रातच घरघर लागली आहे याचे कारण आपलाच व्यवहारातील मराठीचा वापर कमी होत चालला आहे. एकीकडे मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत, तर दुसरीकडे इंग्रजी माध्यमांच्या आणि कॉन्व्हेंट शाळांना अच्छे दिन आले आहेत. पाल्यांवर लहानपणापासून इंग्रजीची सक्ती करून आपण केवळ मराठीला डावलतो आहोत असे नव्हे, तर पाल्यांचा बौद्धिक विकासही खुंटत आहोत हे आपल्या केव्हा लक्षात येणार ? जेव्हा व्यवहाराची आणि शिक्षणाची भाषा एक असते तेव्हाच त्या भाषेचे वैभव आणि त्यातील शब्दसंपदा, खऱ्या अर्थाने आपल्या लक्षात येऊन ती भाषा आपल्या भाव भावना व्यक्त करण्याचे, संवेदना जाणून घेण्याचे, विचार व्यक्त करण्याचे साधन बनते. आजमितीला चारचौघांत इंग्रजी भाषेत संभाषण साधने प्रतिष्ठेचे समजले जाते. प्रतिष्ठेची ही व्याख्या आपणच तयार केली आहे ना ? आपल्याला फारसे इंग्रजी येत नाही म्हणून महाराष्ट्रात मराठी माणूस न्यूनगंड बाळगू लागला आहे. इंग्रजी भाषेत अस्खलित बोलण्यास शिकवणाऱ्या शिकवण्या जागोजागी तयार होऊ लागल्या आहेत त्यामध्ये मोठ्या संख्येने मराठी तरुणच दिसून येतात. ही




गरज कोणी निर्माण केली ? शाळांमध्ये मुलांना भरती करण्याआधी त्यांच्या पालकांना इंग्रजी येते का हे पाहण्यासाठी प्रथम पालकांच्या मुलाखती घेतल्या जातात. अनेक मोठ्या कंपन्यांमध्ये नव्याने नोकरीस लागणाऱ्या मराठी माणसाला आज इंग्रजी मुलाखतीला सामोरे जावे लागते. साधे सिम कार्ड घ्यायचे झाले, तरी त्याचा अर्ज इंग्रजीत भरावा लागतो. महाराष्ट्रात कुठल्याही क्षेत्रात आणि कोणत्याही संदर्भात निवेदन द्यायचे असेल किंवा अर्ज भरायचे असतील, तर त्यासाठी प्रथम पर्याय मराठीचाच असायला हवा ही सक्ती महाराष्ट्रात का केली जात नाही. आज मॉल किंवा सुपर मार्केट या ठिकाणी ग्राहकांशी नीट संवाद साधता यावा यासाठी हिंदी आणि इंग्रजी चांगले येणाऱ्या तरुण तरुणींना नोकरीवर ठेवले जाते त्यासाठी त्यांना अधिक वेतन दिले जाते त्यामुळे अशा ठिकाणी मराठी मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत. ही स्थिती कोणी निर्माण केली ? महाराष्ट्रात राहायचे तर मराठी यायलाच पाहिजे. नीट बोलता नाही आले, तरी मराठी समजायला तर हवेच. आपल्या मातृभाषेला आलेल्या या अवकळेला आपण मराठी भाषिकच कारणीभूत आहोत. आपल्या मातृभाषेविषयी आपली अशीच उदासीनता राहिली, तर पुढच्या पिढीवर मातृभाषेचे संस्कार कसे होतील ? आज मराठी शाळा बंद पडू लागल्या आहेत. घरोघरी आई, बाबा, काका, मामा या गोड नात्यांची जागा आता मम्मा, डॅडा, आंटी, अंकलने घेतली आहे. मुलांना असे म्हणण्यास पालकांकडूनच प्रवृत्त केले जात आहे. मराठी सणांचे महत्त्व कमी होऊन फेब्रुवारीतील 'डेज' उत्साहाने साजरे होऊ लागले आहेत, नाताळात घरोघरी ख्रिसमस ट्री येऊ लागले आहेत, मराठी घरात नववर्ष गुढीपाडव्यापेक्षा एक जानेवारीला अधिक उत्साहाने साजरे होऊ लागले आहे. घरोघरी वाढदिवस हिंदू कालगणनेनुसार तिथींना नव्हे तर इंग्रजी तारखांना साजरे होऊ लागले आहेत. मराठी भाषेला जपायचे असले तर सर्वप्रथम मराठी संस्कृती आणि मराठी अस्मिता जपणे अधिक महत्त्वाचे आहे आणि त्याची सुरुवात प्रत्येक मराठी माणसाने स्वतः पासून आणि आपल्या कुटुंबापासून करायला हवी. 'मराठी बोला, मराठी जगा आणि मराठी वागा' या नीतीचा अवलंब राज्यात सर्वच ठिकाणी केला गेला तरच येणाऱ्या काळात मराठी भाषेला तिचे पुनर्वैभव प्राप्त होईल.

**- जगन घाणेकर, मुंबई.**

टुडेज् ब्लॉग

# किती छान आमची शाळा!

२७ फेब्रुवारीला मराठी राजभाषा गौरव दिन. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून व कुसुमाग्रज यांच्या स्मृतींना अभिवादन म्हणून त्यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून आपण उत्साहात साजरा करतो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणारे ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त मराठी कवी कुसुमाग्रज यांच्या जन्म दिवसानिमित्त आपले राज्य, आपली राजभाषा यांचा गौरव करण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात विविध उपक्रम राबवले जातात. आमच्या जि. प. शाळा खंडाळी तालुका माळशिरस जिल्हा सोलापूर, मध्येही मराठी राजभाषा गौरव दिन खूप उत्साहात साजरा केला जातो. पारंपरिक पोशाखात ग्रंथदिंडी प्रभात फेरी काढली जाते तसेच दिवसभरात विविध सांस्कृतिक उपक्रम राबवले जातात. या व्यतिरिक्त शाळेमध्ये सर्व पारंपारिक सण, उत्सव नियोजनबद्ध पद्धतीने साजरे केले जातात. त्यामुळेच आज शाळेतील राबवले जाणारे उपक्रम याविषयी थोडी माहिती सर्वांना कळावी म्हणून हा शब्दप्रपंच.

**ही आवडते मज मनापासुनी शाळा,**
**लाविते लळा ही जसा माउली बाळा**

आमच्या शाळेतली मुले नेहमी असेच म्हणतात कारण शाळा आहे आमची एक पण तिथे चालतात उपक्रम अनेक. सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील स्वच्छ शाळा, सुंदर शाळा या जिल्हा परिषदेच्या उपक्रमात तालुक्यातून बहुशिक्षकी गटात द्वितीय क्रमांक मिळवणारी आमची शाळा म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खंडाळी.

आमची शाळा ही खंडाळी नावाच्या टुमदार गावात मारुती मंदिराजवळ मध्यवस्तीत वसलेली, सर्वांचे लक्ष वेधून घेणारी शाळा. माझ्या शाळेचे वैशिष्ट्य म्हणजे महिला राज असणारी शाळा. चारचौघींत उठून दिसतेस असे सुंदर स्त्रियांबद्दल बोलले जाते पण या चार चौघींमुळेच आमची स्वच्छ सुंदर शाळा तालुक्यात उठून दिसते असे अभिमानाने बोलले जाते. चौघींकडच्या वेगवेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण गुणांमुळे ही शाळा केवळ शाळा राहिली नसून मुलांना ही शाळा म्हणजे स्वतःचे घरच वाटते एवढा लळा या माऊलींचा त्या बाळांना वाटतो.

उपक्रमांची खाण असणारी चौघींच्या एकीमुळे प्रत्येक उपक्रम यशस्वीपणे राबवला जातो. त्यामुळे मुलांचा पालकांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक झालेला आहे. तसेच मुलांची शाळेविषयीची वाढलेली ओढ व त्यामुळे पटसंख्येवर चांगला होणारा परिणाम सर्वांना जाणवतो. मुलांचा भावनिक, मानसिक, शारीरिक, बौद्धिक व सामाजिक विकास घडून यावा यासाठी आमच्या या ज्ञानकुलात आम्ही निरनिराळे शैक्षणिक, सामाजिक



व सहशालेय उपक्रम राबवत आहोत त्यामुळे आमची मुले नेहमी म्हणतात,

शाळा आमची आहे किती छान नि आम्ही रोज शाळेत येणार. आमच्या शाळेत शाळा पूर्वतयारी मेळाव्यापासून ते 'गुढीपाडवा पट वाढवा' पर्यंत सर्व उपक्रम नियोजनबद्ध पार पाडले जातात. शैक्षणिक उपक्रमामध्ये = तारखेनुसार पाढे पाठांतर, सुंदर हस्ताक्षर, इंग्रजी शब्द पाठांतर, गणिती उदाहरणे तयार करणे, श्रुतलेखन, दत्तक मित्र उपक्रम, मराठी इंग्रजी गणित पेटीचा वापर, मी इंग्रजी वाचणार, गोष्टींचा शनिवार, महावाचन उपक्रम, दप्तराविना शाळा उपक्रम, शब्दांची गोष्ट, मैत्री करू वाचनाशी, प्रश्नमंजूषा, आजचे अक्षर, माझा अंक सहशालेय उपक्रमामध्ये शाळा पूर्व तयारी मेळावा, शाळा प्रवेशोत्सव, आंतरराष्ट्रीय योग दिवस, पालखी सोहळा, थोर नेत्यांच्या जयंती व पुण्यतिथी, पंचमी उत्सव, राख्या व पतंग तयार करणे, राष्ट्रीय सण, दहीहंडी, भोंडला, कला, कार्यानुभव व शारीरिक शिक्षणाचे विविध उपक्रम जसे बैलपोळानिमित्त बैल बनवणे, गणेशोत्सवानिमित्त गणपती बनवणे, दिवाळीनिमित्त आकाश कंदील, मातीच्या पणती, भेट कार्ड, मातीचा किल्ला बनवणे, होळी, मराठी राजभाषा दिन, आंतरराष्ट्रीय महिला दिन, बालदिन, बालिकादिन, बालसभा, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध खेळांच्या स्पर्धा.

सामाजिक उपक्रमामध्ये एक पद एक झाड, एक मूल एक झाड, वर्षभरातील मुलांचे वाढदिवस साजरे करणे, शाळेचे, वर्गाचे मंत्रिमंडळ निवडणूक, खत निर्मिती, प्लास्टिक मुक्त गाव व प्लास्टिक मुक्त शाळा, तंबाखू मुक्त गाव, स्वच्छता मॉनिटर, परसबाग तयार करणे, आरोग्य तपासणी, मेरी माटी मेरा देश अभियान, माझी वसुंधरा अभियान, बाल आनंद मेळावा, बाजार, मातृ पितृ दिन, आजी आजोबा दिवस.

या सर्व उपक्रमांचे फोटो, व्हिडिओ, अहवाल व या उपक्रमांच्या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातम्यांची कात्रणे दशसूत्री कार्यक्रमाच्या वहीमध्ये संग्रहित केले जातात. हे सर्व उपक्रम घेण्याअगोदर नियोजन केले जाते, त्यामध्ये उपक्रमाची गरज व महत्त्व, उपक्रमाचे उद्दिष्ट, उपक्रमासाठी लागणारे साहित्य, उपक्रम राबवताना येणाऱ्या संभाव्य अडचणी, उपक्रमाचे प्रत्यक्ष नियोजन व कार्यवाही व शेवटी उपक्रमाची यशस्विता. या सर्व मुद्द्यांच्या आधारे सर्व शिक्षक चर्चा करून नियोजन करतात. हे सर्व उपक्रम शाळेतील चौघी शिक्षकांच्या, मुलांच्या व पालकांच्या मदतीने यशस्वीपणे पार पाडले जातात.

शाळा एक, उपक्रम अनेक अशा खंडाळी शाळेतील मुले नेहमीच म्हणतात, खेळ-गाणी-गोष्टी सगळ्यांशी दोस्ती, अभ्यासही इथे करणार नि आम्ही रोज शाळेत येणार, शाळा आमची आहे किती छान आणि आम्ही रोज शाळेत येणार.

**- कविता हिंगमिरे,**
**ता. माळशिरस, जि. सोलापूर.**

जन्म हा अखेरचा

# दीक्षापादोदकस्थल



सर्वांना समदृष्टीने पाहणे हीच खरी लिंगदीक्षा होय. कुणाचे उष्टे अन्न वा पदार्थ गुरुने व जंगमाने ग्रहण करताना उरलेला असेल तर तो 'प्रसाद' मानला जातो. उच्छिष्ट समजला जात नाही. जर कोणाच्या मनात प्रसादाबद्दल 'हे उष्टे अन्न आहे' अशी भावना निर्माण झाली तर त्याला रौरव नरकाची प्राप्ती होते, असे म्हटले आहे.

प्रसादाबद्दल उच्छिष्टभाव नसावा, असा याचा अर्थ आहे. इष्टलिंगाला जो दगड समजतो, श्रीगुरुला जो मानव मानतो आणि प्रसादाला उष्टे समजतो तो घोर नरकात पडतो, असे वीरशैवाचार्य सांगतात. ते यासाठी की, तशी भावना बाळगू नये, म्हणून पादोदक प्राशन करताना उच्छिष्ट भावना बाळगू नये. ज्या ठिकाणी दोन व्यक्ती अत्यंत समरस होतात, तेथे उच्छिष्टभाव नसतो. आपल्या लहानग्या बाळाचे चुंबन घेताना त्याच्या मनात कुठे उष्टेपणाची भावना असते? बाळाच्या ताटातले उष्टे अन्न तेव्हा पिता खात असतो किंवा पत्नी-पतींच्या ताटातले अन्न खात असते तेव्हा कुठे उष्टेपणाची भावना असते? त्याप्रमाणे गुरु-शिष्य यांच्यात अभेद निर्माण झाल्याने उच्छिष्ट सूतक पाळले जात नाही. याप्रमाणे पादोदक-क्रियेत गुरु-शिष्याचा व्यवहार अभेदभावाने होत असतो. शरणस्थलातील 'पादोदक' याचा अर्थ गुरु-शिष्यांचा अभेद असाच आहे. सूत्ररुपाने हे असे सांगता येईल.

पाद = गुरु. उदक = शिष्य. पादोदक = गुरु-शिष्यांचे ऐक्य.

पादोदक-क्रियेत प्रत्यक्ष गुरुचरणाचे तीर्थ घेतले जाते. पण शरणस्थलात गुरु-शिष्य यांच्या अभेदबोधाची स्थिती प्राप्त झालेली असते. ही स्थिती कशी प्राप्त होते? तर दीक्षेमुळे. गुरु-शिष्याला चिन्मयी दीक्षा देतो. तू माझ्याशी एकरुप आहेस, तू माझेच रुप आहेस अशा भावनेने गुरु-शिष्यांच्या अभेदस्थितीचा बोध प्राप्त होतो, त्यालाच 'दीक्षापादोदकस्थल' म्हणतात.

**दीक्षयाऽपगद्वैतं यज्ज्ञानं गुरुशिष्ययो:।**
**आनंदस्यैक्यमेतेन दीक्षापादोदकं स्मृतम्**


।।१९.६।। गुरुने दिलेल्या चिन्मय दीक्षेमुळे गुरु-शिष्यातील द्वैतभाव नष्ट होतो.

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु**
**डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# माय मराठी

माय मराठी म्हणायचे आता
दिवस राहिलेत काय?
माय मराठी म्हणायचे आता
दिवस राहिलेत काय? ।।
इंग्रजाळलेल्या शब्दांनी तोबरा भरलेला
नि लहान लेकरांना घेऊन कान्व्हेंट
स्कूलकडे वळतात कसे यांचे पाय?।।
माय मराठी म्हणायचे दिवस आता
राहिलेत काय? ।।
नशीबाबरोबर मम्मी डॅडीचं पेवच फुटलं
हाय।।
हॅलो...हॅलो...
मोबाईल कोकलतोय गुड मॉर्निंग,
गुडनाईट, वायफाय हायफाय ।।
आमचे सुरेल शांत ओवी, भजन, अभंग यांचे



कर्कश पॉपसाँग पायाजवळ तरी बसतील काय?
हाय काय, नाय काय।।
माय मराठी म्हणायचे दिवस
आता राहिलेत काय? ।।
कालपरवाची ही बया आमच्या प्राचीन
मराठीशी स्पर्धा करेल काय?
जगणंच सारं माय सोडून
मावशीचं झालं हाय।।
माय मराठी गे! आता
तुझं करायचं काय।।
सारंच त्रांगड आमचं,
खाली मुंडक वर पाय।।
माय मराठी म्हणायचे दिवस
आता राहिलेत काय? ।।


**- देवेंद्र औटी, सोलापूर.**

# मराठी ही ज्ञानभाषा झाली पाहिजे

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते आणि ज्येष्ठ साहित्यिक वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रजांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन जगात मराठी 'राजभाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. मराठी भाषेचे स्मरण करत असताना मराठीतील कितीतरी चांगले शब्द काळाच्या ओघात लोप पावले आहेत. असे शब्द हुडकून बोली भाषेत त्याचा सर्वांनी वापर केला पाहिजे, केवळ मराठी दिनाच्या निमित्ताने मराठीबद्दल बोलून तिला घासून लख्ख करण्यापेक्षा दरवेळी मराठीच्या अस्तित्वासाठी आपण सर्वांनी झटले पाहिजे. भ्रमणध्वनीवर सध्या मराठी भाषेचे विविध 'ॲप्स'ही आले आहेत, अशा तंत्रज्ञानाचा स्पर्श मराठीला झाला असला तरी तिचा वापर राजभाषा, ज्ञानभाषा आणि व्यवहाराची भाषा म्हणून वाढला पाहिजे, अन्यथा इतर भाषांच्या आक्रमणात अमृताची भाषा मागे पडेल, अशी भीती मला वाटते.

मराठी भाषेची खरी घसरण सुरू झाली ती १९९१च्या आसपास. मराठी मंडळींनी मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालायला सुरुवात केली. इंग्रजी भाषेला विरोध करण्याचे कारण नाही. ती जगाची भाषा आहे आणि ती न येऊन चालणारे नाही, हे खरे असले तरी काळाच्या ओघात इंग्रजी भाषाच श्रेष्ठ असे जे अवडंबर माजवले गेले, तिथे मराठीचा ऱ्हास सुरू झाला.

आपला देश बहुसांस्कृतिक असून प्रत्येक मैलोगणिक भाषा बदलते आणि म्हणूनच बहुभाषेच्या आधाराने भाषा टिकते आणि विकसित होते. मराठी ही ओळख टिकवणे आपले कर्तव्यच आहे. मराठी ही केवळ साहित्य भाषा म्हणून त्याकडे पाहून चालणार नाही. ती संस्कारभाषा, ज्ञानभाषा आणि व्यवहारभाषा होणे गरजेची आहे. नवे ज्ञानविज्ञान मराठी माध्यमातून सुलभपणे येण्यासाठी भाषा तज्ज्ञां कडून विश्वसनीय आणि प्रमाणभूत साधने उपलब्ध झाली पाहिजे,



अद्ययावत ज्ञाननिर्मितीच्या कामात सहज सुलभपणे उपलब्ध होणारी ज्ञानभाषा म्हणून मराठीची वाढ झाली पाहिजे. ज्ञानविज्ञान, तत्त्वज्ञान आणि कला यांच्यातील संशोधन मराठीतून उपलब्ध होणे गरजेचे आहे. विखुरलेल्या मराठी समाजाला मराठीच्या माध्यमातून जोडून घेत या सर्व समाजाचे भाषाज्ञान वाढवणे आवश्यक आहे. मराठी भाषेला सक्षम करण्यासाठी आणि मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवण्यासाठी आपण सर्व मराठी जणांनी आणि महाराष्ट्र सरकारने पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे आम्हाला वाटते.

संस्कृतनंतर सर्व भाषांत मराठी भाषा अधिक सात्त्विक आहे. प्रायोगिक स्तरावर प्रत्येकाने तिचे वैभव टिकवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, 'माय मराठी'ला तिचे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी मराठी भाषिकांनी संघटितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. आपण दृढनिश्चय करूया आणि संघटितपणे 'मराठी'चे रक्षण तसेच संवर्धन करण्यासाठी प्रयत्न आपली स्वाक्षरी मराठीतून करा! 'गुड मॉर्निंग'च्या ठिकाणी 'शुभ प्रभात' म्हणा! मुलांना 'मम्मी-डॅडी' नको, तर 'आई-बाबा' म्हणायला शिकवा! दूरभाषवर बोलताना 'हॅलो' म्हणण्यापेक्षा 'नमस्कार' म्हणून बोलण्यास प्रारंभ करा! सणाच्या शुभेच्छा मराठीतून द्या, उदा. 'हॅपी दिवाली'च्या ठिकाणी 'शुभ दीपावली' म्हणा ! मुलांना 'हॅरी पॉटर' वाचायला न देता 'पंचतंत्रा'तील कथा आणि साने गुरुजी यांची पुस्तके वाचायला द्या! दारावर पाटी मराठीतून लावा! नावात इंग्रजी अक्षरांनी आद्याक्षरे न लिहिता, मराठी (मातृभाषेतील) आद्याक्षरे वापरा. हे काम आपण शाळांमधून करू शकत नाही का? म्हणजेच माझी मराठी ही माझी जबाबदारी नाही का? मराठी ही निव्वळ भाषाच नाही तर ती एक संस्कृती आहे.

**- पद्माकर कुलकर्णी,**
अध्यक्ष महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा,
जुळे सोलापूर.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## हिमोफिलिया डे केअर सेंटरबाबत

# शासकीय रुग्णालय-सिव्हील सर्जन कार्यालय अद्यापही सुस्तच

सुराज्य/सोलापूर

**सोलापूरसह जिल्ह्यातील हिमोफिलिया रूग्णांसाठी सोलपूरचे शासकीय रूग्णालय आणि सिव्हील सर्जन कार्यालयांचे प्रशासन अद्यापही सुस्त असल्याचे दिसून आले. वास्तविक पाहाता काही जिल्ह्यांबरोबर सोलापुरात या सेंटरचे उद्घाटन होणे अपेक्षित होते मात्र या दोनही कार्यालयांमध्ये या सेंटरबाबत मागमूसही नव्हता.**

राज्याचे आरोग्यमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे सुपुत्र डॉ. तानाजी सावंत यांनी राज्यातील २७ जिल्ह्यांमध्ये हे सेंटर उभे करण्याची सूचना ९ फेब्रुवारी रोजी शासकीय रूग्णालयाचे डीन व जिल्हा शल्य चिकित्सक यांना आदेश दिले होते.त्यानुसार नांदेड,उस्मानाबाद व पंढरपूर याठिकाणी या सेंटरचे उद्घाटन सोमवारी दुपारी चारच्या सुमारास डॉ.सावंत यांच्या ऑनलाईन उपस्थितीत झाले.

आपल्या सोलापुरातही उद्घाटन होईल,या आशेने हिमोफिलियाचे रूग्ण सोमवारी सकाळी शासकीय रूग्णालयात जमले होते मात्र कुठेही उद्घाटनाची तयारी दिसून आली नाही.या रूग्णांनी सिव्हिल सर्जन कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेतली व सेंटरबाबत चौकशी केली. सोलापुरात जिल्हा रूग्णालयाचे



काम सुरू आहे. अजून फर्निचरचे काम पूर्ण व्हायचे आहे. हे रूग्णालय सुरू झाल्यानंतर तुमच्यासाठी सेंटर सुरू करण्याचा विचार करू,असे उत्तर एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिले.

वास्तविक पाहता डॉ.सावंत यांची शान उंचावण्यासाठी सोलापूरच्या शासकीय रूग्णालयाने तसेच सिव्हिल सर्जन कार्यालयाने पुढाकार घ्यायला हवा होता परंतु हे सेंटर पंढरपूरला दिले असून तिथे उपचार घ्या, असा सल्ला या अधिकाऱ्यांने भेट घेतलेल्या रूग्णांना दिला.जिल्हा रूग्णालयाचे काम होईपर्यंत सिव्हिलमध्ये हे सेंटर सुरू करण्याची विंनती रूग्णांनी केली तेव्हा या अधिकाऱ्याने डीनना भेटा,असे सांगून रूग्णांना जाण्यास सांगितले.

### २०१६ पासून प्रलंबित

सेटर सुरू करण्याबाबत राज्याचे आरोग्य विभागाने २०२६मध्ये ६ लाखांचा निधी मंजूर केला होता.मात्र जागा नाही,असा रिपोर्ट वर पाठवल्याने हा निधी परत गेला.तेव्हापासूनचा प्रश्न प्रलंबित आहे.आता तर सोलापूरच्या सुपुत्र मंत्र्यांनी मोठा निधी आणून हे सेंटर सुरू करण्याची सूचना करूनही येथील प्रशासनाकडून नेहमीचेच जागेच्या इश्यूचे पालूपद ऐकायला मिळत असल्याने या रूग्णांच्या पालकांकडून शासकीय रूग्णालयाच्या आवारात संताप व्यक्त करण्यात आला.

### मंत्र्यांच्या सूचनेचे पालन झाले का?

डॉ.सावंत यांनी ९ फेब्रुवारीच्या आदेशात ज्या २७ शहरांची यादी जाहीर केली आहे,त्यात सोलापूरचा स्पष्ट उल्लेख आहे.त्यानुसार हे सेंटर सोलापुरातच व्हायला हवे होते. पंढरपूरचा विचार कसा झाला? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. डॉ. सावंत यांच्या सूचनेचे पालन खरोखरच झाले का? अशीही विचारणा होवू लागली आहे.

## पंढरपूरच्या उप जिल्हा रूग्णालयात हिमोफिलिया 'डे केअर'चे उद्घाटन




सुराज्य/पंढरपूर

शहरातील उप जिल्हा रूग्णालयात हिमोफिलिया रूग्णांसाठी डे केअर सेटरचे उद्घाटन सोमवारी करण्यात आले.याठिकाणी हे सेंटर सुरू करण्यात आल्याने या रूग्णांना सर्व सुविधा मिळणार आहेत.

याठिकाणी रक्तविकारतज्ञ डॉक्टरची नियुक्ती करण्यात आली असून रूग्णांना सर्व रक्त घटक (फॅक्टर) मिळण्याची व सर्व तपासण्यांची सोय झाली आहे. या सर्व उपचारांसाठी सोलापूरसह जिल्ह्यातील रूग्णांना पुणे,मुंबई व सातारा याठिकाणी जावे लागायचे.

या सेंटरचा उद्घाटन कार्यक्रम जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, डॉ. श्रीकांत कुलकर्णी, डॉ. महेश सुडके, वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर, डॉ. प्रदीप केचे बालरोग तज्ञ पंढरपूर, विजय सरडे स्त्रीरोग तज्ञ व परिचारिका यांच्या उपस्थितीत पार पडला.

## दक्षिण जवळ आहे, विधिमंडळात आवाज गेला पाहिजे!

### डॉ. श्रीमंत कोकाटेंचा चेतन नरोटे यांना सल्ला

सुराज्य/सोलापूर

धनगर समाजाला प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. चेतन नरोटे यांनी महापालिकेच्या सभागृहात विविध प्रश्नांवर आवाज उठवला आहे. त्यामुळे चेतन नरोटे यांचा आवाज विधिमंडळात गेला पाहिजे. दक्षिण जवळ आहे. प्रयत्न करावा, असा सल्ला इतिहास संशोधक डॉ. श्रीमंत कोकाटे यांनी दिला.

बेलाटी येथे आयोजित केलेल्या आदिवासी धनगर साहित्य संमेलनाच्या समारोप सोहळ्यामध्ये संशोधक डॉ. श्रीमंत कोकाटे यांनी आपल्या भाषणात हा सल्ला दिला. यावेळी विचारमंचावर काँग्रेसचे शहर अध्यक्ष चेतन नरोटे, संमेलनाचे अध्यक्ष माजी आ. ॲड. रामहरी रुपनवर, संस्थापक प्राचार्य डॉ. अभिमन्यू टकले, स्वागत अध्यक्ष श्रीराम पाटील, माजी संमेलनाध्यक्ष प्राचार्य आर. एस. चोपडे, प्रा.शिवाजी बंडगर, बाळासाहेब कर्णवर - पाटील, उपाध्यक्ष संभाजी सुळ, सिद्धारूढ बेडगनुर , उज्ज्वलकुमार माने, बिसलसिद्ध काळे, प्रा.देवेंद्र मदने , कुंडलिक आलदर , विक्रम दानगे , अमोल पांढरे आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. श्रीमंत कोकाटे यांनी धनगर समाजाचे राजकारणातील सद्यस्थितीतील स्थान यावर भाष्य केले. महाराष्ट्रात अधिक लोकसंख्या असलेला दुसऱ्या क्रमांकावरील धनगर समाज आहे, असे असताना धनगर समाजाचा एकही खासदार नाही. या समाजाला प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. चेतन नरोटे यांनी गेल्या अनेक वर्षापासून महापालिका सभागृहात विविध प्रश्नांवर आवाज उठवला आहे. ते निर्भीड, धैर्यवान आहेत. यामुळे चेतन नरोटे यांचा आवाज विधिमंडळात गेला पाहिजे. दक्षिण जवळ आहे. त्यासाठी प्रयत्न करावा, असा सल्ला यावेळी डॉ. कोकाटे यांनी दिला.

## सौंदे येथे तरुणाचा खून; आरोपी फरार

सुराज्य/सोलापूर

सौंदे (ता.करमाळा) येथे रोहित राजू काळे (वय १९ रा.साडे) याच्या खून प्रकरणातील मारेकरी अद्याप फरार असून त्यांचे नावे निष्पन्न झाले नाही.

साडे येथील इंदीरानगरात राहणारा रोहित राजू काळे हा तरुण शनिवारी दुपारच्या सुमारास गावात जाऊन येतो असे बहिणीला सांगून गेला होता. दुसऱ्या दिवशी त्याचा मृतदेह सौंदे येथील शेतात खून केलेल्या अवस्थेत आढळला होता. अनोळखी मारेकऱ्याने अज्ञात कारणावरून तीक्ष्ण शस्त्राने डोक्यात प्रहार करून त्याचा खून केल्याचे पोलीस तपासात आढळले होते.




या प्रकरणी मयत रोहित याची बहीण बालिका राजू काळे (वय २० रा.इंदिरानगर साडे) यांनी करमाळा पोलिसात फिर्याद दाखल केली होती.

त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला. हत्या कोण आणि कशासाठी केले? हे मात्र अद्याप समजले नाही. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक टिळेकर करीत आहेत.

### दारूच्या नशेत साडीने गळफास घेतला

सातरस्ता परिसरातील युनिसिपल कॉलनीत राहणाऱ्या गोविंद किरस्टय्या मावरम (वय २६) या तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्याचा प्रयत्न केला. ही घटना रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली. त्याने नशेत घरातील छताच्याच्या लोखंडी अँगलला साडीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून महेश (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात बेशुद्ध अवस्थेत दाखल केले. सदर बझार पोलिसात याची नोंद झाली आहे.

## पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांची वर्षभराची कारकिर्द

# २ मोक्का, ७ एमपीडीए व ७ टोळ्या हद्दपारीच्या झाल्या कारवाया

सुराज्य/सोलापूर

पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी पदभार घेवून जवळपास वर्ष होत आहे. या वर्षभराच्या काळात त्यांनी २ मोक्का अंतर्गत कारवाया केल्या तर ७ एमपीडीएच्या कारवाई केली. ७ टोळ्यांना हद्दपार केले. या ७ टोळ्यांमध्ये ३१ आरोपींचा समावेश आहे. या सर्व कारवाया स्थानिक गुन्हेशाखेचे पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या नेर्तृत्वाखाली सहाय्यक फौजदार निलकंठ जाधवर व पोलीस नाईक अनिस शेख यांनी ही कामगिरी केली.

सरदेशपांडे यांनी अधीक्षक पदाचा पदभार घेतल्यापासून आत जवळपास वर्ष होत आले आहे. प्रथम मोक्काची कारवाई ही पंढरपूर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत असलेल्या वाळू तस्करांवर करण्यात आली. या टोळीवर चोरी, दरोडा यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. ग्रामीण पोलीसांनी टोळी प्रमुख बबलू प्रक्षाळे (रा. पंढरपूर) व त्याच्या ५ साथीदारांवर मोक्का अंतर्गत कारवाई केली. मोक्काची दुसरी कारवाई टेंभूर्णी पोलीस ठाण्याच्या अंतर्गत असलेल्या टोळी प्रमुख निखील बाळू चव्हाण (रा. वेळापूर ता.माळशिरस) व त्याच्या ३ साथीदारांवर करण्यात आली.

तसेच एमपीडीएच्या ७ कारवाया करण्यात आल्या. तर जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यातील ७ टोळ्यावर हद्दपारीच्या कारवाया करण्यात आल्या आहेत. यामध्ये ३१ आरोपींना हद्दपार करण्यात आले आहे. या मध्ये वाळू तस्कर व शरिराविषयक गंभीर गुन्हे दाखल असलेले आरोपी आहेत. महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम ५६ प्रमाणे हद्दपारीचे ६२ जणांविरूध्द प्रस्ताव संबंधित प्रांत कार्यालयास सादर करण्यात आले आहेत. महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम ५७ प्रमाणे १२ जणांचे हद्दपारीचे प्रस्ताव प्रांत कार्यालयात सादर करण्यात आले आहेत. यामध्ये झोपडपट्टी दादांचा सुध्दा समावेश आहे.

## मोटरसायकल घेत नाही म्हणून आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर** : रुद्धेवाडी (ता.अक्कलकोट) येथे राहणाऱ्या आमसिद्ध दर्याप्पा पुजारी (वय १९) या तरुणाने राहत्या घरात विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली. आई वडिलांनी दुचाकी घेत नाही म्हणून त्याने रागाच्या भरात पिकावर फवारणीचे द्रव प्राशन केले होते. त्याला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सिद्धाराम (शेजारी) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

## हत्तीज येथे काठीने मारहाण; वृद्ध दांपत्यासह तिघे जखमी

**सोलापूर** : किरकोळ तक्रारीवरून काठी आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत वृद्ध दांपत्यासह तिघेजण जखमी झाले. ही घटना हत्तीज (ता.बार्शी) येथे रविवारी सायंकाळच्या सुमारास घडली. बाबलिंग आदिनाथ शिंदे (वय ७५) त्यांची पत्नी चंद्रभागा (वय ६०) आणि सचिता मंगेश काळे (वय ३५ सर्व रा.हत्तीज) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना वैराग येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. रविवारी सायंकाळच्या सुमारास त्यांना घराजवळ येऊन पोपट जाधव, समिंदर गांडुळे आणि अन्य ५ जणांनी मिळून मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## दुचाकी अपघात; जखमी तरुणाचा मृत्यू

**सोलापूर** : खवणी (ता.मोहोळ) येथे दुचाकीच्या अपघातात जखमी झालेला संकेत मोतीराम भोसले (वय २२ रा. खवणी) हा उपचारादरम्यान सोलापुरातील शासकीय रुग्णालयात सोमवारी पहाटे मयत झाला. तो ७ फेब्रुवारी रोजी रात्रीच्या सुमारास खवणी ते मोहोळ असा दुचाकीवरून प्रवास करीत होता. खवणी पाटी येथे रस्ता क्रॉस करताना पंढरपूरच्या दिशेने जाणाऱ्या दुसऱ्या एका दुचाकीच्या धडकेने तो जखमी झाला होता. त्याला सोलापुरातील खाजगी रुग्णालयात उपचार करून २३ फेब्रुवारी रोजी पंकज (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान तो सोमवारी मयत झाला. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## अकलूज नगरपरिषद, अकलूज

ता.माळशिरस, जि.सोलापूर महाराष्ट्र
फोन-(०२१८५) २२२०३५, २२२५९२
email.comcakluj21@gmail.com
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
स्थापना दिनांक.०३/०८/२०२१

जा.क्र.६९/अ.न.प./२०२४ दि.२६/०२/२०२४

### जाहिर प्रसिद्धीकरण (मुदतवाढ)

अकलूज नगरपरिषद आरोग्य विभागकडून अकलूज नगरपरिषद घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शहरातील नागरी दैनंदिन निर्माण होणाऱ्या घनकचाऱ्यावर प्रक्रिया करणे कामाचे जाहिर हे निविदा सूचना (आयडी क्र.२०२४_DMA_10107791_1) दि.२०/२/२०२४ रोजी दैनिक सुराज्य या वृत्त पत्रामधून जाहिर प्रसिद्धीकरण करून प्रस्तुत संगणकीय प्रणालीद्वारे ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती.

तथापि प्राणाली मध्ये काही तांत्रिक समस्ये मूळे प्रस्तुत ई निविदा (आयडी क्र. २०२४_DMA_10107791_1) यास दि.२७/०२/२०२४ ते २९/०२/२०२४ अखेर मुदतवाढ देणेत येत आहे, तरी अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
(दयानंद गोरे)
मुख्याधिकारी तथा प्रशासक
अकलूज नगरपरिषद, अकलूज

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषत: मंगळवेढा परिसरातील लोकांना या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे परिशिष्ठ - डि सोलापूर सब डि व ता.मंगळवेढा पैकी मौजे बोराळे येथील शेतजमीन गट नं.४८०, क्षेत्र ० हे-९५ आर. पो.ख. ० हे -०३ आर. आकार, ३ रू-६० पैसे यांसी चतु:सिमा पुर्वेस- गट नं.४८१, दक्षिणेस-गट नं.४७७, पश्चिमेस-गट नं.४७९, उत्तरेस-रहाटेवाडी शिव रस्ता येणेप्रमाणे वर परिशिष्टात नमूद वर्णनाची मिळकत महादेव मारूती बाबळे यांचे खरेदीमालकी वहीवाटीची आहे. सदरची शेतजमिनी महादेव मारूती बाबळे यांनी आमचे अशिलास खरेदी देणेचे निश्चित केलेले आहे. ही शेतजमीन निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व भरवसा त्यांनी आमचे अशिलांना दिला आहे. सदरच्या शेतजमीनीवर कोणाचाही, कसलाही, वारस, पोटगी, लीज, साठेखत, अशा प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास आमचेकडे संबंधितांनी हरकत नोंदवावी. ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसात कोणाची हरकत न आल्यास आमचे अशिल हा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाची ही हरकत चालणार नाही. याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. ता.२७/०२/२०२४.

सही/-
श्री.अवधुत वसंत कांबळे
बी.एस.सी.,एलएल.बी., ॲडव्होकेट
३६८३, आंबेडकर नगर, संतपेठ,
पंढरपूर, जि.सोलापूर.
रजि.नं.एमएएच/१६०/२००१
मो.नं.९७६७३३५६५०

## दुधनी नगरपरिषद, दुधनी
### जाहीर प्रसिद्धीकरण

जा.क्र.जा.क्र.दुनप/आरोग्य विभाग/१८८/२४
दिनांक : २६/०२/२०२४

संदर्भ : मा.राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान(ना.) यांचे पत्र क्र.राअस/शहर समन्वयक/२१४/२३-२४ दि.२३/०२/२०२४. दुधनी नगरपरिषद आरोग्य विभागाकडे शहर समन्वयक (City Co-ordinator) या पदावर पात्र उमेदवाराची कंत्राटी तत्त्वावर नियुक्तीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

पदाचे नाव शैक्षणिक पात्रता : शहर समन्वयक (कंत्राटी)

शैक्षणिक पात्रता : मान्यताप्राप्त विद्यापिठातील खालीलपैकी कोणत्याही शाखेतील पदवी १) बी.ई./बी.टेक. (कोणतीही शाखा) २) बी.आर्क ३) बी.प्लॅनिंग ४) बी.एस.सी.(कोणतीही शाखा)

नियुक्ती कालावधी : ११ महिने

मानधन : प्रतिमाह रूपये ४५,०००/- (इतर कोणतेही शासकीय लाभ प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे मिळणार नाहीत अथवा कसल्याही प्रकारचे वेतनभत्ते अदा केले जाणार नाहीत.)

अनुभव : स्थानिक स्वराज संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडीत कामाचा किमान सहा महिन्याचा अनुभव आवश्यक आहे.

वयोमर्यादा : कमाल वयोमर्यादा ३५ वर्ष (शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव वयोमर्यादा शिथील करण्यात येईल.)

अर्ज करण्याचे ठिकाण : दुधनी नगरपरिषद कार्यालय, दुधनी ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

अर्ज सादर करण्याचा कालावधी : दि.२७/०२/२०२४ ते दि.०५/०३/२०२४ कार्यालयीन वेळेत

सही/-
मुख्याधिकारी, दुधनी नगरपरिषद





## जनता विद्यालय व महाविद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**वेळापूर** : मळोली (ता. माळशिरस) येथील जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेज मळोली या प्रशालेतील दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक बी. आर. जाधव हे होते. पर्यवेक्षक के. बी. बाबर यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले. यावेळी संगीता राजगे, संस्कृती लोखंडे, आरती वाघमारे, अविनाश ढेंबरे, प्राची जाधव, तनिष्का जाधव, सायली मगर, मानसी गायकवाड, अनुष्का इंगोले, तनुजा जाधव या विद्यार्थ्यांनी शाळेतील आठवणींना उजाळा दिला. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी अश्रू अनावर झाले. यावेळी दहावीच्या विद्यार्थ्यांनी प्रशालेसाठी दहा हजार १११ रूपयांची देणगी दिली. विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक बी. आर. जाधव, ए. एस. पानसरे, एस. बी. बाबर, डी. एम. जाधव यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विजय झुरुळे, एस. डी. काळे, नानासाहेब मारकड, अनिल थिटे, निलेश जाधव, प्रतिभा सावंत, शेख, वर्षाराणी पिसे, मिताली सरतापे, सुनील गुजर, किशोरकुमार शिंदे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डी. टी. धुमाळ यांनी तर उपस्थितांचे आभार पी. एस. जाधव यांनी मानले.


---




## मोहोळ येथे संत रोहिदास महाराज जयंती साजरी

**मोहोळ** : मोहोळ येथे संत रोहिदास महाराज यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी झाली. सोमराय नगरात संत रोहिदास प्रतिष्ठान व वंचित बहुजन आघाडीच्यावतीने आयोजित कार्यक्रमात मान्यरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल गायकवाड, रिपब्लिक पिपल फ्रंटचे प्रदेशाध्यक्ष धनंजय आवारे, श्वेता राजगुरू, पांडुरंग खांडेकर, विष्णू शिंदे, माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर, प्रा. अशोक पाचकुडवे, गणेश शिंदे ग्रामसेविका केवळे, उद्योजक इलियास शेख, बापू डोके आदी मान्यवर उपस्थित होते. धनंजय आवारे यांनी संत रोहिदास यांनी त्यावेळी जातीयतेवर कसा प्रहार केला व सध्याची परिस्थिती याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी इयत्ता ९वीच्या आतील विद्यार्थ्यांसाठी रांगोळी, लिंबू चमचा, संगीत खुर्ची आदी स्पर्धा झाल्या. आयुष्यमान भारत कार्डही काढण्यात आली. संध्याकाळी कुर्डूवाडी येथील बापू कांबळे यांच्या वैशाली गायन पार्टीचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमासाठी रमेश शिंदे, समाधान शिंदे, सोमनाथ कोळी, लखन कोळी, बापू भोसले, शरद केवळे, सोहम केवळे, मनोज कोळी, महेश मोरे, नागेश भांगे कैलास केवळे, आशिष केवळे, बबलू कोळी आदींनी प्रयत्न केले.

---



## शिवराज पुकळे यांची माळशिरस तालुका भाजयुमो अध्यक्षपदी निवड

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील शिवराज पुकळे यांची माळशिरस तालुका भाजयुमो तालुकाध्यक्षपदी नुकतीच निवड झाली आहे. निवडीचे पत्र खा. रणजितसिंह नाईक निंबाळकर यांच्या उपस्थितीत भाजयुमो जिल्हाध्यक्ष शंभूराजे जगताप यांच्या हस्ते देण्यात आले. शिवराज पुकळे यांनी निरा देवधरचे पाणी पश्चिम भागातील वंचित भागाला मिळावे म्हणून मोठा लढा उभारला होता. पक्षवाढीसाठी व सर्वसामान्यांना न्याय मिळवून देणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

---



## बहुजन मुक्ती पार्टी माळशिरस तालुका युवक अध्यक्षपदी पिनू येडगे

**वेळापूर** : मुंबई येथे बहुजन मुक्ती पार्टी युवा आघाडी महाराष्ट्र राज्य प्रधान सचिव अमोल लोंढे यांच्या हस्ते पिनू येडगे यांना बहुजन मुक्ती पार्टी युवक माळशिरस तालुकाध्यक्षपदी निवडीचे पत्र देण्यात आले.

यावेळी बहुजन मुक्ती पार्टीचे प्रदेशाध्यक्ष श्रीकांत ओव्हाळ, बहुजन मुक्ती पार्टी राज्य प्रवक्ते काकासाहेब जाधव, जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब धाईंजे, वेळापूर तंटामुक्ती समिती अध्यक्ष युवराज मंडले, महेंद्र साठे, बहुजन मुक्ती पार्टीचे तालुका अध्यक्ष नागेश वाघबरे, आबासाहेब वाघमारे, सिकंदर कोरबू, बजरंग कानगे, पिनू लोखंडे, रिकेश चव्हाण, विनायक भगत, अमोल साठे व सर्व मित्रपरिवार उपस्थित होता.

# विकसित भारत संकल्प यात्रेचा २५ हजार जणांना लाभ

### ‘मोदी गॅरंटी व्हॅन’ उपक्रमाला प्रतिसाद

**सुराज्य/सोलापूर**

केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ देण्यासाठी आलेल्या ‘मोदी गॅरंटी व्हॅन’ला शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ‘विकसित भारत संकल्प यात्रेच्या दुसऱ्या टप्प्याचा समारोप २५ फेब्रुवारी रोजी साईबाबा चौक, सोलापूर येथे झाला. यात्रेदरम्यान शहरातील ३६ ठिकाणी घेतलेल्या विशेष शिबिरात सुमारे २५ हजार नागरिकांनी योजनांचा लाभ घेतल्याची माहिती उपायुक्त मच्छिंद्र घोलप व क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण यांनी दिली.

केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचावी तसेच त्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ शिबिरांच्या माध्यमातून व्हावा या उद्देशाने सुरु झालेल्या




या यात्रेदरम्यान ९ हजार ३७८ नागरिकांनी संकल्प प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमाच्या ठिकाणी महानगर पालिकेच्यावतीने प्रधानमंत्री स्वनिधी योजना, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी), आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आदीसंदर्भात माहिती आणि प्रत्यक्ष लाभ देण्याकरिता शिबिराचे आयोजन केले होते.

शिबिरात प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचा ७१६ जणांना लाभ दिला तसेच १ हजार ३५० नागरिकांना गोल्डन कार्डचे वितरण केले. १ हजार ८६६ जणांनी प्रधानमंत्री स्वनिधी योजना आणि ३९२ नागरीकांनी आधार दुरुस्ती व नवीन नाव नोंदणीचा लाभ घेतला. तसेच २ हजार १७५ नागरीकांची आरोग्य तपासणी झाली. ‘मेरी कहानी मेरी जुबानी’ या उपक्रमांतर्गत केंद्रीय योजनांचा लाभ घेतलेल्या ४१ लाभार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच ऑडिओ-व्हिडिओच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवली.

व्हॅनच्या समारोपप्रसंगी क्षेत्रीय प्रचार सहायक अंबादास यादव, कार्यालय सहायक जे. एम. हन्नुरे, आरोग्य विभागाचे डॉ. बालराज म्हेत्रे, डॉ. अलकुंटे, डॉ. शैलजा जयदीप व नर्स स्टाफ, एनयूएलएमचे राघवेंद्र अलकुंटे, प्रधानमंत्री आवास योजना समाज विकास अधिकारी सिध्दाराम मेंडगुदले, नागनाथ पदमगोंदे, पूजा भूतनाळे, सुमित जाधव, शशिकांत सकट आदी उपस्थित होते.



## होम मिनिस्टर कार्यक्रमाला प्रतिसाद

**सुराज्य/पंढरपूर**

भारत भालके यांच्या जयंतीनिमित्त आयोजित भारत कृषी महोत्सवामध्ये खास महिलांसाठी ‘होम मिनिस्टर’ ‘खेळ पैठणीचा’ या कार्यक्रम रविवार दि. २५ फेब्रुवारी रोजी पार पडला. कार्यक्रमास महिला वर्गाने अलोट गर्दी केली होती.

सुरुवातीला कर्तुत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. स्पर्धेत उखाणे, जुन्या पिढीतील महिलांचे बऱ्याच वेळ चालणारे उखाणे तर आधुनिक पद्धतीचे वैचारिक दर्शन घडवणारे उखाणे स्पर्धा चांगलीच रंगली. तळ्यात-मळ्यात या खेळाचा महिलांनी मनसोक्त आनंद लुटला. यावेळी मराठी, हिंदी गाणी, नृत्य, मनोरंजन खेळ, विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

प्रथम क्रमांकास पैठणी, दुसऱ्या क्रमांकाला सोन्याची नथ, तर तिसऱ्या क्रमांकाला ठुशी हे बक्षीस देण्यात आले. सादरीकरण रमेश परळीकर यांनी केले. नियोजन डॉ. प्रणिता भालके यांनी केले.

स्पर्धांच्या माध्यमातून महिलांसाठी एक व्यासपीठ भगीरथ भालके यांनी उपलब्ध करून दिल्याने महिलांनी आभार मानले. आयोजन लोकनेते स्वर्गीय आ. भारतनाना भालके फाउंडेशन पंढरपूर-मंगळवेढा यांच्यावतीने केले होते.

# सरकारी गोडावूनमध्ये घुसखोरी; चौकीदाराला मारहाण

### बाळू जाधवसह दहा जणांविरूध्द गुन्हा दाखल

**सुराज्य/सोलापूर**

केगाव येथील सरकारी गोडावूनमध्ये तारेचे कुंपण तोडून सरकारी जागेत ४ फुटापर्यंत गाळ्याचा भाग आल्याने तो काढून घ्या, असे सांगणाऱ्या मृदा व जलसंधारण विभागाचा चौकीदार खंडू पाटील यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी बाळू बबन जाधव, बाळू वसंत माने, रवी बबन जाधव, अमोल बबन जाधव, परशुराम वसंत माने, ज्ञानेश्वर जाधव, संतोष जाधव, खंडू संतोष जाधव, सोनू ज्ञानेश्वर जाधव वसंत पंढरी माने सर्व (रा. सोलापूर) या १० जणांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणी मृदा व जलसंधारण उपविभागाचे चौकीदार खंडू मच्छिंद्र पाटील यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. यात म्हटले आहे की, दि. २१ फेब्रुवारी रोजी १० वाजण्याच्या सुमारास खंडू पाटील हे सरकारी गोडावूनच्या गणवेषात सरकारी काम करीत होते. त्यावेळी वरील १० आरोपींनी सरकारी गोडावूनच्या तारेचे कुंपन तोडून सरकारी जागेत ३ ते ४ फुटापर्यंत त्यांच्या गाळ्याचा भाग आल्याने तो काढा असे सांगितले. त्यावेळी वरील १० जणांनी चौकीदार खंडू पाटील यांच्या गणवेषाची कॉलर पकडून त्यांना खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व शिवीगाळ करून तुला बघून घेण्याची धमकी दिली. या फिर्यादीवरून वरील १० जणांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे करीत आहेत.

## निलम नगर येथील ताडी दुकान बंद करा

**सुराज्य/सोलापूर**

निलम नगर येथे सरकारमान्य ताडी दुकान सुरू केले आहे. दुकान तातडीने बंद करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या कामगार सेलचे अध्यक्ष डॉ. गोवर्धन सुंचू यांनी केली आहे. ताडी केंद्र सुरू झाले, त्यावेळी नागरिकांच्या उठावानंतर तत्कालीन जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी ते बंद केले होते. मात्र, आता पुन्हा नवीन आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांनी हे ताडी केंद्र पुन्हा सुरू करण्यास परवानगी दिली आहे.

परिसरातील लोकवस्तीत कामगार वर्ग मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे हे ताडी विक्री केंद्र तातडीने बंद न झाल्यास मोर्चा काढण्यात येणार आहे असा इशारा दिला आहे. यावेळी लक्ष्मण पुल्ली, रमेश म्हनताटी, अंबादास पोतराज, विनोद करली, प्रकाश अन्नम आदी उपस्थित होते.

## कोयता गळ्यास लावून मारहाण

**सोलापूर** : मल्लिकार्जुन लॉनच्या बाजूला अवि हेअर स्टाईलमधून कटिंग करून बाहेर आलेल्या निलेश हरे यांना, ‘तू आमच्या आरपी बॉसच्या वाटेला का जातोस असे म्हणून हरे यांच्या गळ्यास कोयता लावून दमदाटी करून मारहाण केल्याप्रकरणी राहुल पाटील, विनोद पायमल्ले, संकेत जाधव, शशिकांत बागलकोटे, मनोज गिडगिर सर्व (समाधान नगर, अक्कलकोट रोड) या ५ जणांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणी निलेश चंद्रकांत हरे (रा. ३१ रा. समाधान नगर, अक्कलकोट रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. यात म्हटले आहे की, दि. २३ फेब्रुवारी रोजी १० वाजण्याच्या सुमारास निलेश हरे हे मल्लिकार्जुन लॉनच्या बाजूला असलेल्या अवि हेअर स्टाईल या दुकानात कटिंग करून बाहेर आले. त्यावेळी वरील ५ जणांपैकी एकाने निलेश हरे यांना चापट मारली व तू परवाच्या भांडणामध्ये ईंटरफियर का केला, तु आमची नावे का सांगितली तसेच इतरांनी तू आमच्या बॉसची नावे का सांगतो, तुला लय माज आलाय का? असे म्हणून हाताने मारहाण केली. ऊस तोडण्याचा कोयता निलेश हरे यांच्या मानेस लावून तुला आता एक वेळ सोडतो, यापुढे तु माझ्या वाटेला जाऊ नकोस असे म्हणून दमदाटी केली.

## रिपाइं आठवले गटाच्या पाठपुराव्यामुळे अंगणवाड्यांना इमारतीसाठी मिळाली जागा

**सुराज्य/वेळापूर**

वेळापूर ग्रामपंचायत हद्दीतील मंजूर अंगणवाड्या इमारतीसाठी तात्काळ जागा द्यावी व इमारती बांधकामासाठी अनुदान प्रस्ताव सादर करावेत अशी सातत्याने मागणी रिपाइं आठवले माळशिरस तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांनी वेळापूर ग्रामपंचायतीकडे केली होती. अखेर त्यांच्या पाठपुराव्यामुळे सर्व मंजूर अंगणवाड्यांना हक्काची जागा मिळाली.

याप्रकरणी सरतापे यांनी दिलेल्या निवेदनात शिवाजीनगर भाईनाथ नगर, अयोध्या नगर सुमित्रा कॉलनी, पनासे वस्ती खोरे वस्ती, मंडले वस्ती काशीद वस्ती, पारधे वस्ती इत्यादी ठिकाणी अंगणवाड्या मंजूर आहेत. त्यापैकी खोरे वस्ती, काशीद वस्ती, पारधे वस्ती या तीन ठिकाणी अंगणवाडीसाठी जागा उपलब्ध आहे परंतु इतर अंगणवाड्यांसाठी जागा इमारत नसल्याने अंगणवाड्या उघड्यावर खाजगी जागेत भरवल्या जात आहेत, असे म्हटले होते.

वेळापूर ग्रामपंचायतीला या प्रश्नाबाबत मिलिंद सरतापे यांनी पाठपुरावा केल्याने सरपंच रजनीश बनसोडे, ग्रामविकास अधिकारी के. बी. सुरवसे यांनी अंगणवाडीच्या जागेच्या प्रश्नाबाबत मिलींद सरतापे



यांना याबाबत पत्र दिले. पत्रात वेळापूर ग्रामपंचायतीने अंगणवाडीसाठी खालीलप्रमाणे जागा उपलब्ध करून दिल्या आहेत. काशीदवस्ती १००६/२/ब, अयोध्यानगर सुमित्रा कॉलनी १२०० पैकी १२००/१,१२००/२/५/४८७, पारधे वस्ती ७६६, खोरे वस्ती मंडले वस्ती ४५६/१, मुसलमान वस्ती डोंबारी गल्ली ३१९१, सांगोला रोड ५ या ठिकाणी जागा दिले आहेत. अंगणवाडीच्या इमारतीसाठी अनुदान मागणी प्रस्ताव पंचायत समिती माळशिरस कार्यालयाकडे सादर केल्याचे पत्रात म्हटले आहे.

मिलिंद सरतापे यांच्या प्रयत्नामुळे वेळापूर तालुक्यातील पंचक्रोशीतील अंगणवाड्यांच्या जागेचा प्रश्न मिटला. आता या अंगणवाड्यांसाठी लवकरच इमारती बांधणार असून विद्यार्थ्यांचे जागेविना होणारे त्रास कमी होणार आहेत.

## नैसर्गिक जीवनशैलीमुळे अस्थी बळकट होतात : जोशी

**सांगोला** : सोप्या घरगुती उपायाने व सकारात्मक जीवनशैलीमुळे हाडाची मजबुती टिकवून ठेवता येऊ शकते, असे विचार फलटण येथील जोशी हॉस्पिटलचे संचालक डॉ. प्रसाद जोशी यांनी व्यक्त केले.

सांगोल्यातील श्री सिद्धी विनायक महिला ज्येष्ठ नागरिक संघ व धनगर समाज सेवा महिला मंडळ सांगोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत अस्थी-चिकित्सा शिबिरात मार्गदर्शन करताना डॉ. जोशी बोलत होते.

शहरातील नगरपालिका बचतगट इमारतीत रविवारी हे शिबिर झाले. यावेळी संघाच्या अध्यक्षा आशा सलगर, सचिव वर्षा इंगोले यांच्यासह कार्यक्रमाचे पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्षा




राणी माने, स्वाती मगर, महिला सूत गिरणी चेअरमन कल्पना शिंगाडे, डॉ. कृष्णा इंगोले, हभप कृष्णाजी इंगोले उपस्थित होते.

दररोज किमान अर्धा तास कोवळ्या उन्हात बसून राहिल्यास व सकारात्मक, आनंदी जीवन अंगिकारली तर ज्येष्ठ नागरिकांना औषध-गोळ्यांची गरज लागणार नाही, असेही जोशी यांनी सांगितले.

शिबिरात उपस्थित ज्येष्ठ नागरिकांची तपासणी करून त्यांना मार्गदर्शन केले. गुडघा, शस्त्रक्रिया, संभाव्य खर्च यावर भाष्य करताना योग, प्राणायाम, व्यायाम व आनंदी वृत्ती जोपासण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक व स्वागत आशा सलगर यांनी तर आभार डॉ. कृष्णा इंगोले यांनी केले.

## सारंग संगीत विद्यालयातील यशस्वितांचा सन्मान

**सुराज्य/वेळापूर**

डिसेंबर २०२३मध्ये अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या वतीने घेतलेल्या संगीत परीक्षेत सारंग संगीत विद्यालय खंडाळीच्या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे. सर्व गुणी विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा पार पडला.

ऋतुजा जाधव, राज गायकवाड, अर्चना वाघ, माधुरी गोरे ,समर्थ भोसले, रसिक साठे,



पार्श्व दोशी, संस्कृती दोशी, लेखणी साठे, आण्वी साठे, संचिता भोसले, संस्कार भोसले, राजनंदन जगदाळे, प्रेम गांधी यांनी यश प्राप्त केले.यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार निर्मल ग्रामीण पतसंस्थेचे अध्यक्ष व खंडाळीचे माजी उपसरपंच सुभाष गांधी यांच्या हस्ते झाला.

विद्यालयाचे संचालक झांबरे यांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी अध्यक्ष सुभाष गांधी, विनोद थिटे यांची भाषणे झाली. सर्व विद्यार्थ्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाला पताळे, अजित कदम, आप्पा पताळे व गणेश मुळे यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन शरद भोसले यांनी केले. आभार लखन साठे यांनी मानले.

# सहा महिन्यांनी जनतेला शासकीय कार्यालयात जावे लागणार नाही : विखे-पाटील

**सुराज्य/अनगर**

राज्य व केंद्रशासन सर्वसामान्य नागरिकांना विविध कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून लाभ मिळवून देत आहे. राज्यशासन पुढील सहा महिन्यात सर्व सेवा व व्यवहार ऑनलाईन करणार असल्याने एकाही माणसाला शासकीय योजनांच्या लाभासाठी शासकीय कार्यालयात जाण्याची गरज भासणार नसल्याचे प्रतिपादन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

अनगर येथे दुय्यम निबंधक श्रेणी १ कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार सर्वश्री यशवंत माने, बबनदादा शिंदे, राजेंद्र राऊत, माजी आ.

### गतिमान सेवा देण्याचे निर्देश

महसूल मंत्री विखे-पाटील यांनी दुय्यम निबंधक कार्यालयाची पाहणी करून या कार्यालयामार्फत सर्वसामान्य नागरिकांना अत्यंत गतिमान पद्धतीने सेवा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत, असे निर्देश दिले.

राजन पाटील, दीपक साळुंखे, अमरसिंह पंडित, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बळीराम साठे, अभयसिंह शेळके पाटील, प्रकाश चवरे, अजिंक्यराणा पाटील, विक्रांत पाटील आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

सलोखा योजनेच्या माध्यमातून शेती विषयक अनेक समस्या सोडवल्या जात आहेत. शेत रस्ते, पाणंद रस्ते निर्माण केले जात आहेत. पशुसंवर्धन विभागाने गोसेवा कायदा आणल्याने देशी गाईंच्या संवर्धनाला प्रोत्साहन मिळत आहे. तसेच लंपी आजार आल्यानंतर राज्यातील सर्व गोवंशीय जनावरांचे लसीकरण मोफत करण्यात आले. देशात मोफत लसीकरण फक्त आपल्या राज्यातच करण्यात आल्याचे विखे यांनी सांगितले.

अनगर येथील नागरिकांची मागणी तसेच लोकप्रतिनिधींचा पाठपुरावा यामुळे दुय्यम निबंधक कार्यालय श्रेणी १ येथे निर्माण केले असे सांगत अनगरला अप्पर



तहसील कार्यालयही मंजूर करत असल्याची घोषणा विखे यांनी केली.

माजी आ. राजन पाटील यांनी प्रास्ताविक केले. अनगर येथे दुय्यम निबंधक कार्यालय दिल्याबद्दल त्यांनी शासन व महसूल मंत्री यांचे आभार मानले.

यावेळी आ. यशवंत माने यांनी महसूल भवन इमारतीसाठी पंधरा कोटींच्या निधीची मागणी केली.

आ. राजेंद्र राऊत यांनी पशुखाद्य व दूध दरात मोठी तफावत असून दुधाला जादा दर देण्याची मागणी केली.

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रसेविका समितीतर्फे आज हस्तलिखिते विषयावर परिसंवाद

**सोलापूर** : राष्ट्रसेविका समिती सोलापूरतर्फे शिवस्मारक सभागृहात मंगळवार दि. २७ फेब्रुवारी रोजी 'हस्तलिखिते' या विषयावर सायंकाळी सहा ते आठ या वेळेत परिसंवाद आयोजित केला आहे. डॉ. माया पाटील या प्राचीन गुंफा, लेण्यातील चित्रलिपी, हस्तलिखितांचा विद्धंस, अश्मयुग, ताम्र युग असा लेखन प्रवास या विषयावर विचार मांडतील. पत्रकार अरविंद जोशी हे लेखन प्रवास, लेखनाची आवश्यकता आदी विषयावर बोलणार आहेत. माधव देशपांडे हे विविध लिपी, गुन्हे तपासात हस्ताक्षरांचे महत्त्व विषयावर मांडणी करणार आहेत. शिरीष घाटे हे हस्तलिखिते हे कलाविष्कार आदी विषयावर विचार व्यक्त करतील, असे जिल्हा बौद्धिक प्रमुख सविता लळित यांनी सांगितले.



### शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दफ्तर वाटप

**अकलूज** : अकलूजचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शिवकिर्ती युवा मंचच्या वतीने महाळूंग जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांना दफ्तर वाटपाचा प्रारंभ शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्याहस्ते करण्यात आला. स.म.शंकरराव मोहिते पाटील साखर कारखान्याचे संचालक रामचंद्र सावंत पाटील, गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, अरुण तोडकर, सुहास गाडे, अनिल जाधव, रतनसिंह रजपूत, अनिल मुंडफणे, तानाजी भगत, सोमनाथ मुंडफणे, रावसाहेब सावंत पाटील, मोहसिन पठाण, संदीप घाडगे, रशीद मुलाणी, रमेश देवकर, संग्रामसिंह राजपूत, सागर यादव, सतीश पवार, मदन भगत, मुख्याध्यापक बाळासाहेब साठे उपस्थित होते. वाढदिवसानिमित्त माळशिरस तालुक्याच्या पूर्व भागातील १४ गावातील सर्व जिल्हा परिषद शाळेतील सुमारे ३१५० विद्यार्थ्यांना दफ्तर वाटप होणार आहे. कार्यक्रमासाठी मंचाचे उपाध्यक्ष अनिल उघडे, प्रीतम एकतपुरे, प्रकाश गायकवाड, शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. प्रास्ताविक नाचणे यांनी केले. सूत्रसंचालन सुभाष मिसाळ यांनी तर आभार हनुमंत लोहार यांनी मानले.

### जिल्हा कारागृहात टच स्क्रिन किओस्क सिस्टिम व ई मुलाखतीचे उद्घाटन

**सोलापूर** : जिल्हा कारागृहात दि. २६ फेब्रूवारी रोजी ई प्रिझनस (आयसीजेएस) प्रणाली अंतर्गत टच स्क्रिन किओस्क सिस्टिम व ई मुलाखतीचे उदघाटन प्रमख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. आजमी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कारागृहाचे अधीक्षक हरिभाऊ मिंड व वरिष्ठ तुरूंगधिकारी भाऊसाहेब आगवाने, तुरूंगधिकारी प्रदीप बाबर व इतर कर्मचारी व बांधव उपस्थित होते. टच स्क्रिन किओस्क सिस्टिम मध्ये बंद्यांना त्यांच्या बायोमॅट्रीक फिंगर प्रिंटच्या सहाय्याने त्यांच्या केस संदर्भात अद्यावत माहिती, मनिऑर्डर, बंदी वेतन, पॅरोल/फर्लो रजा, भेटी करिता येणारे नातेवाईक तसेच कारागृहातील माफी दिवस व सर्व इतर माहिती पाहणे शक्य होणार आहे. ई मुलाखती मार्फत बंद्यांना घरच्या नातेवाईकांशी संपर्क करता येत आहे. त्यामुळे बंदीचे नातेवाईक याचा वेळ व पैसा बचत होत आहे. ये-जा करण्याचा त्रास कमी झाला आहे.

### स्वामी विवेकानंद नगरमध्ये २५ हजारांच्या मोबाईलची चोरी

**सोलापूर** : स्वामी विवेकानंद नगरात राहणारे तात्या जाधव यांच्या घरातील हॉलमध्ये चार्जिंगला लावलेला २५ हजार रूपये किंमतीचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला. या प्रकरणी तात्या चंदु जाधव (वय ६२ रा. स्वामी विवेकानंद नगर, विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. यात म्हटले आहे की, दि. २४ फेब्रुवारी रोजी २ वाजण्याच्या सुमारास जाधव यांच्या घराच्या हॉलमध्ये जाधव यांचा २५ हजार रूपये किंमतीचा मोबाईल चार्जिंगला लावला होता. तो मोबाईल चोरट्याने चोरून नेला. या फिर्यादी वरून चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. याचा पुढील तपास पोलीस नाईक शिर्के हे करित आहेत.

# रेशन लाटणाऱ्या नोकरदारांवर कारवाई करा

## सांगोल्याच्या तहसिलदारांचे पुरवठा विभागाला आदेश

सुराज्य/सांगोला

महाराष्ट्र शासन पुरवठा विभागाकडून अन्नसुरक्षा योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखाली व काही प्रमाणात केसरी शिधापत्रिकाधारकांना प्रतिव्यक्ती पाच किलो मोफत धान्य दिले जाते. मात्र १७० सरकारी नोकरदारांना लाभ मिळत असून त्यांच्यावर कारवाईचे आदेश सांगोल्याचे तहसिलदार संतोष कणसे यांनी पुरवठा विभागाला दिले आहेत.

योजना गरिबांसाठी असताना सांगोला शहर व तालुक्यातील १७० सरकारी अधिकाऱ्यांची नावे या योजनेत समाविष्ट असल्याचे पुरवठा अधिकारी नितीन जाधव व पुरवठा निरीक्षक




दराडे यांनी तहसिलदारांना सांगितले आहे. त्यानंतर तहसिलदारांनी हे आदेश दिले. लाभ घेतलेल्या नोकरदारांकडून शासन बाजारभावाप्रमाणे रेशन धान्याचे पैसे वसूल करणार आहे. त्याप्रमाणे नोटीस बजावण्याचे काम चालू केले आहे.

### बाजारभावानुसार रक्कम वसूल करणार

पुरवठा विभाग या कर्मचाऱ्यांचा शोध घेऊन त्यांना नोटीस बजावून त्यांना एकत्रित कुटुंबातील असल्यास विभक्त करून घेणे, रेशनचा लाभ सोडणे असे पर्याय दिले जातील. तसे न झाल्यास आतापर्यंत उचललेल्या धान्याची बाजारभावानुसार रक्कम वसूल केली जाईल अशी माहिती तहसीलदार संतोष कणसे यांनी दिली आहे.

संबंधित १७० नोकरदारांवर कडक कारवाई केली जाईल व पिवळ्या शिधापत्रिका धारकांची सखोल तपासणी करणार असल्याचे पुरवठा विभागाकडून सांगण्यात आले. पुरवठा विभागाकडून रेशन कार्ड, आधार कार्ड व मोबाईल क्रमांक एकमेकांशी लिंक होण्याने अनेक शासकीय कर्मचारी या योजनेत समाविष्ट असल्याचे अधिकाऱ्यांना दिसून आले आहे. त्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालय व तहसील कार्यालय यांना दिली आहे.

# महापालिकेत डॉल्बीचा दणदणाट: आदेशाचे उल्लंघन

## मंडळाच्या अध्यक्षाविरूद्ध गुन्हा

सुराज्य/सोलापूर

महानगरपालिकेत संत राहिदास जयंती मिरवणुकीत दि. २४ फेब्रुवारी रोजी १०.५० वाजण्याच्या सुमारास डॉल्बी मोठ्या आवाजात लावून आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी मंडळाचे अध्यक्ष सुरेश सिध्दप्पा सन्नके (कोनापुरे चाळ, रेल्वे लाईन) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

या प्रकरणी हवालदार प्रभाकर देडे यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. यात म्हटले आहे की, दि. २४ फेब्रुवारी रोजी १०.५० वाजण्याच्या सुमारास महापालिकेत येथे संत रोहिदास बहु. सामाजिक संस्था, सोलापूर हे मंडळ महानगरपालिकेत आले. त्यावेळी मंडळाचे अध्यक्ष व डॉल्बी धारक शंकर यांनी संत रोहिदास जयंती मिरवणुकीकरिता व पारंपरिक वाद्य वाजविण्याकरिता पोलीस उपायुक्त (परिमंडळ) यांच्याकडून दिलेली वेळेची मर्यादा व परवाना पारित केलेल असताना देखील मंडळाचे अध्यक्ष व डॉल्बीधारक यांनी आदेशाचे उल्लंघन करून मोठ्याने वाद्य चालू ठेवून सार्वजनिक ठिकाणी उपद्रव करित असताना मिळून आला.

या प्रकरणी सुरेश सन्नके याच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. याचा पुढील तपास हवालदार गायकवाड हे करित आहेत.

# निवडणुकांसाठी युवकांनी झोकून काम करावे

## प्रल्हादसिंह पटेल; कामती येथे भाजप युवक मेळावा

सुराज्य/विरवडे बु

पंतप्रधान मोदी यांनी ५ वर्षात देशाचा विकासस्तर उंचाविला त्यामुळे जनतेने २०१९ मध्ये एकतर्फी निकाल भाजपला दिला. गेल्या पाच वर्षात मोदी व फडणवीस यांचे उत्कृष्ट काम आहे. त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत युवकांनी झोकून देवून काम करावे असे, आवाहन मध्यप्रदेशाचे कॅबिनेट मंत्री प्रल्हादसिंह पटेल यांनी केले.

कामती बु. (ता. मोहोळ) येथे युवक तालुकाध्यक्ष अंकुश आवताडे यांनी पदाधिकारी, कार्यकर्ता बैठक व युवक संवाद मेळावा आयोजित केला होता. यावेळी ते बोलत होते.

व्यासपीठावर खा. जयसिद्धेश्वर महास्वामी, जिल्हाध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी, युवक जिल्हाध्यक्ष सुदर्शन यादव, प्रदेश उपाध्यक्ष अमर साबळे, आ. सुभाष देशमुख, माजी आ.प्रशांत परिचारक, आ. समाधान आवताडे, विजयराज डोंगरे, विक्रम देशमुख, शहाजी पवार, शशिकांत चव्हाण आदी उपस्थित होते.




कामतीमधील मेळाव्यात मध्यप्रदेशमधील मंत्री प्रल्हाद सिंह पटेल यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आ. कल्याणशेट्टी, आ. आवताडे, प्रशांत परिचारक आदी दिसत आहेत.

प्रास्ताविकात आ. कल्याणशेट्टी यांनी मोदींच्या कामावर प्रभावित होऊन हजारो लाखो युवक भाजपकडे आकर्षिले जात असल्याचे सांगितले. आ. आवताडे यांनी नरेंद्र-देवेंद्र या विकास प्रिय पुरुषांचे आदर्श डोळ्यासमोर ठेवून युवकांनी भाजपाचे काम तळागाळात पोहचवले पाहिजे, असे सांगितले. यावेळी पदाधिकाऱ्यांना निवडी पत्र देण्यात आले.

प्रमुख कार्यकर्त्यांचे पक्ष प्रवेश घेण्यात आले. यावेळी सतीश काळे, संजीव खिलारे, अर्चना बचूटे, प्रकाश घोडके, प्रमोद जाधव, तयाप्पा गावडे, महेश धुमाळ, समीर लिमये, बंडू पाटील, बाळासाहेब नाईकनवरे आदींसह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

# कुर्डूतील रेल्वे भुयारी मार्गाचे ऑनलाइन उद्घाटन

सुराज्य/कुर्डूवाडी

कुर्डू (ता.माढा) येथील रेल्वे गेट क्र.३७ वरील भुयारी मार्गाचे पंतप्रधान मोदी यांच्याहस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उद्घाटन झाले. यावेळी अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत १५०० रोड ओव्हर ब्रीजचे लोकार्पण आणि ५५४ स्थानकांच्या कायापालटासाठी पायाभरणीही झाली.

### वारंवार इंटरनेट विस्कळीत

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भाषण एलईडी टीव्हीवर थेट प्रक्षेपणातून सुरू झाले. मात्र यावेळी वारंवार इंटरनेट विस्कळीत होत असल्यामुळे भाषण ऐकण्यास व्यत्यय आला. अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून आले. यामुळे गावकऱ्यातून नाराजी व्यक्त केले.



### पालखी मार्गावरील भुयारी मार्गाची मागणी

कुर्डू येथे पंढरपूर आषाढीवारी दरम्यान मोठ्या प्रमाणात वारकऱ्यांची पालखी जात असते. मात्र कव्हे – कुर्डु पालखी मार्गावर रेल्वे रूळावर अद्याप भुयारी मार्ग झाला नसल्यामुळे पालखीला रूळ ओलांडून येताना कसरत करावी लागते. याकडे रेल्वे प्रशासनाचे महत्वाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होत आहे. पालखी मार्गावर त्वरित भुयारी मार्ग सुरू करण्याची मागणी सरपंचांनी केली.

कुर्डु येथील अंडरपास मार्ग ६ मीटर रुंद, ५ मीटर उंच तर १८ मीटर लांबीचा पथमार्ग असलेला आहे. या पथमार्गामुळे परिसरातील गावांची येण्या-जाण्याची सुरक्षित सोय झाली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजीव वल्लेकर यांनी केले. त्यानंतर कुर्डू येथील नागनाथ विद्यालय व प्रगती स्कूलमधील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत व विविध गीतेनृत्य सादर केली. विकसित रेल्वे स्टेशन कसे असेल या विषयावर रेल्वे द्वारे

### मोदींच्या हस्ते कार्यक्रम



घेतलेल्या वक्तृत्व, निबंध व प्रश्नोत्तर स्पर्धेचे बक्षिस वितरण करण्यात आले.

पंतप्रधान मोदी यांनी दहा वर्षापूर्वी रेल्वेचे बजेट ४५ हजार करोड होते. आजते २ लाख ५० हजार करोड इतके आहे,असे सांगितले. यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष अमोल कुलकर्णी, माढा तालुका युवा आघाडी अध्यक्ष उमेश पाटील, महादेव बागल, सुधीर गाडेकर, बाबाराज जगताप,ग्रा. पं.सदस्य संतोष कापरे, उमेश पाटील ,मदन मुंगळे, बोबडे, नारायण गोडसे,प्रतीक्षा गोफणे,स्वाती गोरे , वासंती गवळी, पद्मावती दातार आदी उपस्थित होते.

# लग्नात लाऊडस्पिकर लावून धिंगाणा

## १ लाख ४० हजारांचे साहित्य जप्त; तिघांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

बापूजी नगर येथील मोची समाज ऑफिसजवळ भावाच्या लग्नात साऊंड सिस्टिम मोठ्याने लावून लोकांना नाचवून उपद्रव केल्याप्रकरणी दीपक भास्कर म्हेत्रे, पैगंबर राजू शेख व शाहबाज हानिफ रंगरेज (रा. शुक्रवार पेठ) या तिघांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. यावेळी पोलिसांनी, काळ्या व भगव्या रंगाचे दोन बेस, साऊंड सिस्टिम, एम्प्लीफायर असा १ लाख ४० हजाराचे साहित्य जप्त केले.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सागर गुंड यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

गुंड यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. २४ फेब्रुवारी रोजी १०.१५ वाजण्याच्या सुमारास बापूजी नगर येथील मोची समाज ऑफिसजवळ म्हेत्रे याने त्याच्या भावाच्या लग्न समारंभाच्या निमित्ताने घरासमोर विनापरवाना काळ्या व भगव्या रंगाचे बेस, साऊंड सिस्टिम, एम्प्लीफायर हे पैगंबर शेख याने मोठ्या आवाजाने चालू ठेवले. त्याच्या समोर लोकांना नाचवून उपद्रव करित असताना मिळून आला. तसेच शाहबाज रंगरेज याने वरील दोघांशी संगनमत करून विनापरवाना साऊंड सिस्टिम लावली.

या फिर्यादी वरून दिपक म्हेत्रे, पैगंबर शेख व शाहबाज रंगरेज या तिघांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. याचा पुढील तपास हवालदार चव्हाण हे करित आहेत

# 'प्रभाकर महाराज की जय' चा गजर

## पुण्यतिथीनिमित्त गुलाल कार्यक्रमास भाविकांची गर्दी

**सोलापूर** : रविवारी श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज पुण्यतिथीनिमित्त भाविकांच्या मोठ्या उपस्थितीत गुलाल कार्यक्रम झाला. यावेळी 'श्री सद्गुरू प्रभाकर स्वामी महाराज की जय' चा गजर घुमला.

पुण्यतिथी महोत्सवानिमित्त रविवारी सकाळी प्रभाकर स्वामींच्या समाधीवर मंदिराचे उपाध्ये दिगंबर जोशी यांच्या पौरोहित्याखाली उदय वैद्य यांच्याहस्ते संकल्पाभिषेक झाला. यानंतर तर्पणविधी व मीना जोशी यांच्या अधिपत्याखाली श्री गुरुगीता पारायणाची समाप्ती झाली. सायंकाळी पं. दीपक कलढोणे यांची भजनसेवा झाली. प्रकाश कोथिंबीरे व दत्तात्रय कुसेकर यांचे रात्री सांप्रदायिक भजन झाले. रात्री १०.४५ वाजता भक्तिमय वातावरणात गुलालाचा कार्यक्रम झाला. यावेळी ट्रस्टी दत्तात्रय देशमुख, बाळकृष्ण शिंगाडे, उदय वैद्य, वसंत बंडगर,



वामन वाघचौरे, मोहन बोड्डू, रवी गुंड, सुभाष बद्दूरकर, प्रकाश कोथिंबीर, दत्तात्रय कुसेकर आदी उपस्थित होते.

**सोमवारी हजारो भाविकांना लाडू वाटप**

महोत्सवानिमित्त सोमवारी हजारो भाविकांना लाडू प्रसादाचे वाटप करण्यात आले. सकाळी मूर्तीची पूजा व सामूहिक आरती झाली. आरतीनंतर मीना जोशी यांच्याहस्ते प्रसादाचे वाटप केले.

# 'गाथा नवनाथांची' मालिकेत अनुभवता येईल

## अंबाबाई मंदिरातील किरणोत्सव सोहळा

### कलाकारांनी पत्रकारांशी साधला संवाद

सुराज्य/सोलापूर

सोनी मराठी वाहिनीवरील नवनाथांची कथा उलगडून दाखविणारी 'गाथा नवनाथांची' ही पौराणिक मालिका लवकरच ९०० भागांचा टप्पा पार करणार आहे.

यामध्ये आतापर्यंत नवनाथांपैकी सात नाथांचा अवतार,त्यांचा प्रवास आणि लीला दाखवण्यात आला.मालिकेच्या आगामी भागात कोल्हापुरातील करवीरनिवासिनी महालक्ष्मी मंदिरातील किरणोत्सव सोहळा प्रेक्षकांना अनुभवता येणार असल्याचे अभिनेते जयेश शेवलकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

मालिकेतील कलाकार अभिनेता जयेश शेवलकर व नकुल घाणेकर रविवारी अक्कलकोट येथे स्वामींच्या दर्शनासाठी आले होते. दर्शनानंतर सोलापुरात त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.'गाथा नवनाथांची' ही मालिका,सोनी मराठी वाहिनीवर २१ जून २०२१ रोजी सुरू झाली. अध्यात्मिकतेचा धागा धरून तयार करण्यात आलेल्या मालिकेला मराठी प्रेक्षकांनी प्रचंड प्रतिसाद दिला, असे जयेश शेवलकर व नकुल घाणेकर यांनी सांगितले.



### सकारात्मक दृष्टिकोन शिकायला मिळाला : शेवलकर

मच्छिंद्रनाथाची भूमिका साकारण्यापूर्वी नाथ परंपरेविषयी थोडीफार माहिती होती. आज मच्छिंद्रनाथाची भूमिका साकारत असताना प्रेक्षक त्या भूमिकेला स्मरून चरणस्पर्श करण्याचा प्रयत्न करतात, मात्र तो प्रयत्न मच्छिंद्रनाथासाठी असतो, असं मी मानतो. मनाविरुद्ध घडलं तर हताश व्हायचं नाही, हा सकारात्मक दृष्टिकोन या भूमिकेतून शिकायला मिळाला, जयेश शेवलकर यांनी सांगितले.

# ग्रामपंचायत निवडणुकीच्या निर्णयाकडे गावगाड्यातील पुढाऱ्यांचे लक्ष

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील दहा ग्रामपंचायतीची मुदत संपली आहे. काही ग्रामपंचायतीची मुदत फेब्रुवारी महिन्यात संपणार आहे. यासाठी २३ फेब्रुवारी रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाली आहे. परिणामी सध्या गावगाडयात निवडणुकीची जोरदार तयारी सुरु झाली आहे.

निवडणुकीबाबत निवडणुक आयोगाने अद्याप कोणताही निर्णय जाहीर केलेला



नाही. नक्की निर्णय काय होतोय याकडे गावगाडयातील पुढाऱ्याचे लक्ष आहे. सध्या लोकसभा निवडणुकीचे वारे वाहु लागले आहे. यामुळे अगोदर लोकसभेच्या निवडणूका होणार का ग्रामपंचायतीच्या याविषयी पुढाऱ्यांमध्ये जोरदार चर्चा सुरु आहे. ग्रामपंचायत निवडणुकीसाठी प्रभाग रचना,प्रभागनिहाय आरक्षण व अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यामुळे निवडणुका नक्की कधी होणार याविषयी तर्क-वितर्क लावले जात आहेत.

ग्रामपंचायतीच्या निवडणुका लोकसभा निवडणुक झाल्यावरच होतील अशीही चर्चा आहे. त्यामुळ मुदत संपलेल्या व संपणाऱ्या ग्रामपंचायतीवर शासन प्रशासकांच्या नियुक्त्या करेल. यामुळे किमान चार ते पाच महिने ग्रामपंचायतीचा कारभार प्रशासकाडे जाईल असा अंदाज आहे. जर ग्रामपंचायतीच्या निवडणुका पुढे गेल्या तर त्या विधानसभेच्या निवडणुकीपुर्वी होतील.

पण निवडणूक आयोग ग्रामपंचायतीच्या निवडणुकीबाबत काय निर्णय घेतेय याकडे लक्ष लागले आहे. सोमवारपर्यंत याबाबत निर्णय अपेक्षित होता, पण सोमवारी उशीरापर्यंत कोणताही निर्णय आला नाही.

## संक्षिप्त वृत्त

### सोलापुरात उद्या ध्यानावर विशेष शिबीर

**सोलापूर** : येथील दि पिरॅमिड सिरिच्युअल ट्रस्टतर्फे ध्यान,स्वाध्याय आणि उदभेद यात्रा, उत्क्रांतीचा प्रवास या विषयावर विशेष शिबिराचे आयोजन बुधवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत फडकुले सभागृहात करण्यात आले आहे. कार्यक्रमात ध्यानाचे शिक्षण देऊन जीवन यशस्वी आणि सुखी करण्याचे तंत्र दीप्ती नाडेला शिकविणार आहेत तसेच सोलापूर शहरामध्ये हैदराबाद रोड येथील जुना विडी घरकुल, नवीन यशोधरा हॉस्पिटलच्या मागे अतिशय सुंदर असे गणेश पिरामिड ध्यान केंद्र आहे. येथे ध्यान करण्यासाठी उत्तम अशी बैठक रचना, ध्यानावरील पुस्तके तसेच ध्यान शिकविणारे तज्ञ प्रशिक्षक आहेत. हे ध्यान केंद्र सर्वांसाठी मोफत खुले आहे.



### कर्मयोगी विद्यालयात दहावीतील विद्यार्थ्यांना निरोप

**पंढरपूर** : पंढरपूर तालुक्यातील तारापूर येथील कर्मयोगी माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांना मार्च २०२४ मध्ये होणाऱ्या एस.एस.सी.प्रमाणपत्र परिक्षेत उज्ज्वल यश संपादन करण्यासाठी विद्यालयाचे वतीने निरोप व शुभेच्छा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला होता. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भीमा साखर कारखान्याचे मा.संचालक व संस्थेचे मार्गदर्शक अभिमन्यू वाघ,यांनी मार्गदर्शन करताना ' विद्यार्थ्यांनों भविष्यातील स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रम घेतले तरच यश संपादन करता येते.'असे सांगितले ,तर मुख्याध्यापक भानवसे डी.एस. यांनी 'उद्याच्या परिक्षेत कसलीही भीती न बाळगता उत्साही वातावरणात चांगले यश मिळवून आपले ध्येय साध्य कराअसे आवाहन केले.' सर्व विद्यार्थ्यांनां गुलाब पुष्प देत शुभेच्छादेण्यात आल्या. तसेच यावेळी शिक्षक व विद्यार्थी यांनी मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक बिटकर सर, नकाते सर, कदम सर,श्रीमती मोटे (माने) मॅडम, गायकवाड सर,राजगुरू सर,वाघ सर,शिंदे सर,शेख मॅडम,शिक्षकेतर कोष्टीसर , मनोज कुंभार, गणपत कुचेकर उपस्थित होते,कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.




### भोगाव येथे संत रोहिदास महाराज जयंती साजरी

**उत्तर सोलापूर** : तालुक्यातील भोगाव येथे संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठपणा करण्यात आली. सोलापुरातील सुप्रसिद्ध भजनी मंडळओम श्री हरी भजनी मंडळ व ह भ प व्हनकडे महाराज, संत संप्रदायाचे अध्यक्ष ह भ प श्री सुधाकर महाराज इंगळे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. जुगलबंधी भारुडाच्या कार्यक्रमही घेण्यात आला. त्यानंतर भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात आला. या वेळेस संतोष घोडके, उमेश वाघमारे,हारीदास वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थापक संत रोहिदास जयंती उत्सव मंडळ हरिदास वाघमारे, अध्यक्षा- लक्ष्मी क्षिरसागर, बाबुराव क्षिरसागर, विनोद क्षिरसागर, व्हट्टे महाराज, विजय उकरंडे, मल्हारी वाघमारे, समाधान व्हनकडे, राम चौगुले, राम रोकडे, काशिनाथ थोरात आदींनी परिश्रम घेतले.

---

### रे-नगर घरकुल संस्थेत दिव्यांगांना ५ टक्के घरे सवलतीत द्या

**सोलापूर** : सोलापुरात प्रधानमंत्री आवाज योजनेअंतर्गत, बांधण्यात येणाऱ्या व आलेल्या घरकुल प्रकल्पात दिव्यांगांना शासनाच्या अध्यादेशानुसार (जीआर) ५ टक्के घरकुले देण्यात यावी., अशा मागणीचे निवेदन महाराष्ट्र अंध अपंग व्यंग बहुउद्देशीय संशोधन संस्था सोलापूरच्या वतीने संघटनेचे अध्यक्ष बाबुराव अहमदसाहेब फनीबंद, यांच्या नेतृत्वाखाली दिव्यांग शिष्टमंडळाद्वारे देण्यात आली. अलीकडे सोलापुरात गोरगरीब व पात्र कामगारांना, प्रधानमंत्री योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या ३०००० घरकुलांपैकी, पंधरा हजार घरकुले १९ जानेवारी २०२४ रोजी भारत देशाचे पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते वाटप करण्यात आली. परंतु या योजनेत ५ टक्के दिव्यांगांना घरकुले देण्याचा अध्यादेश शासनाचा आहे. प्रत्यक्षात दिव्यांगांना घरकुले दिलेली नाही, असा आरोप अपंग संघटनेचे अध्यक्ष बाबूलाल फनिबंद यांनी केला आहे. जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात, कासिम कोरगी, स्वामी,तोफिक शेख उपस्थित होते.

---

### बाळेजवळ रेल्वेखाली तरुणाचा मृत्यू

**सोलापूर** : सोलापूर ते पुणे लोहमार्गावरील बाळे रेल्वे स्थानकाच्या अलीकडे विकी चव्हाण (वय १९, रा.थोबडे वस्ती, मूळ रा.उत्तर प्रदेश) याचा मृतदेह रेल्वेखाली सापडलेल्या अवस्थेत आढळला. सोमवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी पहाटे एक वाजेच्या सुमारास हा प्रकार आढळून आला. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलीस ठाण्यात झाली आहे. घटनेमागील कारण समजले नाही. हवालदार रुपनर पुढील तपास करीत आहेत.

# दूध उत्पादकाला ५ रूपये अनुदान मिळणार कधी?

## फक्त एक महिन्याचे अनुदान मिळवण्यासाठी अनेक अटी व शर्तींचे डोंगर

**सुराज्य/सोलापूर**

दुधाचे दर कोसळल्यानंतर राज्य शासनाच्या वतीने पाच जानेवारीला गायींच्या दुधाला प्रतिलिटर अनुदानाची घोषणा केली. मात्र, हे अनुदान मिळवण्यासाठी अनेक क्लिष्ट अटी व शर्तींचा समावेश यामध्ये करण्यात आला होता. त्यामुळेच दूध उत्पादकाला पाच रुपये अनुदान मिळण्यास विलंब होत आहे. सरकारने दिलेली वेळ संपून पंधरा दिवस उलटून गेले तरी अनुदान मिळले नसल्याने शेतकऱ्यांतून नाराजी व्यक्त केली जात आहे.

जिल्ह्यात अनेक ठिकाणी एअर टॅगिंग करताना जनावरांच्या आवश्यक सुधारित नोंदी, सुधारित मालकी हक्क नोंदणी, नव्याने जनावरे नोंदणी, इअर टॅगिंग



बदल, अशा अनेक उपनोंदी देखील त्यामध्ये काळजीपूर्वक कराव्या लागत आहेत. ही प्रक्रिया अतिशय वेळखाऊ व ऑनलाइन पोर्टलच्या गतीवर अवलंबून आहे. परिणामी या सर्व नोंदी करताना पशुपालकाची तसेच पशुसंवर्धन कर्मचाऱ्यांची देखील दमछाक होत आहे.

मागील सहा ते सात महिन्यांपासून दुधाचे दर निश्चिती पातळीवर आली आहेत. त्यामुळे एकेकाळी ३८ रुपये लिटरपर्यंत असणारा दुधाचा दर २५ ते २७ रुपये लिटरपर्यंत खाली आला होता. त्यामुळे दूध उत्पादकाला थेट अनुदान देण्याचा निर्णय राज्य सरकारने जानेवारी महिन्यात घेतला होता. मात्र, हे अनुदान केवळ ११ जानेवारी ते १० फेब्रुवारी दरम्यान उत्पादित दुधाला लागू होणार आहे. हे एक महिन्याचे अनुदान मिळवण्यासाठी सुद्धा शेतकऱ्यांसमोर अनेक अटी व शर्तींचे डोंगर राज्य सरकारने या अध्यादेशामध्ये घालून दिले होते. या योजनेत सहभागी होण्यासाठी प्रथमतः सहकारी व खासगी दूध प्रकल्पांना दुग्ध व्यवसाय विकास आयुक्तांकडे अर्ज करणे बंधनकारक आहे. तसेच दूध उत्पादक शेतकऱ्याचे बँक खाते हे शेतकऱ्याच्या आधार कार्ड सोबतच पशुधनाच्याही आधार कार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे. योजनेमध्ये सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांकडे दुधाळ जनावरांची नोंदणी भारत पशुधन पोर्टलवर करणे बंधनकारक केले आहे. तसेच संबंधित दूध उत्पादकाचे बँक खाते हे देखील भारत पशुधन पोर्टलवर नोंदवावे लागणार आहे.

दूध उत्पादक सभासदांना देखील आपापल्या सहकारी संघ तसेच खासगी प्रकल्पांकडे ही प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून तसेच सातत्याने पाठपुरावा करून अनुदान मिळवावे लागणार आहे.

### अनुदानाचा टेकू नको,उत्पादन खर्चानुसार दर द्या

एक तर शेतकऱ्याला अनुदानाचा टेकू नको आहे. दुधाच्या उत्पादन खर्चानुसार दुधाला दर मिळणे सध्याच्या परिस्थितीमध्ये अत्यंत गरजेचे आहे. मात्र निवडणुका डोळ्यासमोर ठेवून आपण शेतकऱ्याला काहीतरी मदत करतोय अशा बढाया मारण्यासाठीच हे अनुदानाचे गाजर पुढे केले आहे. मात्र, हे अनुदान देताना सुद्धा अनेक निकषांच्या गाळण्या लावण्यात आल्या. जेणेकरून हे अनुदान खऱ्या लाभार्थ्यापर्यंत जाऊ नये याची काळजी देखील राज्य शासनाकडून घेतली जात आहे. या लावलेल्या गाळण्यांमुळे अनुदानाच्या रकमेचा अपहर होण्याचा देखील धोका आहे. झाकली मूठ सव्वा लाखाची उघडली तर कवडी मोलाची अशी या अनुदानाच्या अध्यदेशाची अवस्था आहे.

– **पांडुरंग रायते,** प्रदेशाध्यक्ष, शेतकरी संघटना

# 'पुरुष समजून घेताना' वर वालचंद महाविद्यालयात चर्चासत्र

## स्त्री-पुरुष विषमता मानणारी मानसिकता बदलणे काळाची गरज : डॉ. काळे

**सुराज्य/सोलापूर**

समाजातील पुरुषांच्या बद्दल असलेली गृहीतके म्हणजे स्टिरियोटाईप्स (साचेबंद कल्पना) यांचा पुरुषांना त्रास होत आहे, त्यामुळे पुरुषांची घुसमट वाढत आहे, असे मत पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे यांनी व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर सोलापूर शहर पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे, साहित्यिक समीर गायकवाड, समाजकार्य विभागाच्या डॉ.विजया महाजन आदींची उपस्थिती होती.

प्रास्ताविकात डॉ.विजया महाजन यांनी स्त्री - पुरुष समानता ही काळाची गरज असून हे एक अनुकरणीय सामाजिक मूल्य आहे. हा विचार रूजवण्याकरीता जागर करणे म्हणजे समाजात दुभंगलेली समानता प्रस्थापित करणे होय, असे




सांगितले.

समीर गायकवाड यांनी पुरुषांच्या मनामधील आईला साद घातली तर कौटुंबिक स्तरावरचे प्रश्न उद्भवतच नाहीत असे प्रतिपादन केले. परिसंवादात डॉ.महावीर साबळे, डॉ.अर्चना इंजल,डॉ.दत्तात्रय कांबळे,डॉ.अंजना सोनवणे आदींनी समीक्षणात्मक मनोगत सादर केले ज्यामध्ये विविध आयामातून पुरुष समजून घेतला गेला.

प्राचार्य डॉ संतोष कोटी यांच्या भाषणाने चर्चासत्राचा समारोप झाला. सूत्रसंचालन डॉ.दिपाली पाटील यांनी तर आभारप्रदर्शन डॉ.पद्मावती पाटील यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक परीक्षा नियंत्रक डॉ.एस पी गायकवाड, प्रा.डॉ.महावीर शास्त्री, समाजकार्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. निशा वाघमारे डॉ. ओवाळ आदींसह विद्यार्थी, विधीज्ञ तसेच अभ्यासक, विद्यार्थी आदींची उपस्थिती होती.

# दुधनी रेल्वे स्टेशन नूतनीकरणाची पायाभरणी

**सुराज्य/अक्कलकोट**

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सोमवार दि. २६ फेब्रुवारी रोजी ४१ हजार कोटींच्या प्रकल्पांची घोषणा केली. अमृत भारत स्टेशन योजनेतंर्गत एकूण ५५३ स्टेशन्सची पुनर्बांधणी केली जाणार आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्यातील ५६ तर सोलापूर विभागातील चार रेल्वे स्टेशनांचा समावेश आहे. योजनेंतर्गत दुधनी रेल्वे स्टेशन नूतनीकरणाचा पायाभरणी समारंभ दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून पार पडला.

रेल्वेमंत्री आश्विन वैष्णव हे देखील दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. मंचावर खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य, अविनेश वर्मा, दुधनी मुख्याधिकारी आतिष वाळुंज, दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अप्पू परमशेट्टी, मिलन कल्याणशेट्टी, आरपीआयचे अध्यक्ष गोरखनाथ



धोडमनी उपस्थित होते.

प्रास्ताविकात अविनेश वर्मा यांनी दुधनी रेल्वे स्थानकावर होणाऱ्या कामाच्या संदर्भात माहिती दिली. योजनेंतर्गत येथील विविध शाळांमध्ये चित्रकला व निबंध स्पर्धातील विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी येथील एस. जी. परमशेट्टी हायस्कूल, मातोश्री लक्ष्मीबाई म्हेत्रे प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी देश भक्तिपर गाण्यावर नृत्य सादर केले. कार्यक्रमानंतर खा. जयसिद्धेश्वर शिवाचार्य स्वामीजी यांनी येथे सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली.

कोल्हापूर - कलबुरगी गाडीला दुधनी स्थानकावर थांबा मिळाल्यास सर्वांना नियोजित ठिकाणी वेळेवर पोहोचण्यास मदत होईल असे खासदारांनी सांगितले. महेश पाटील, रामचंद्रप्पा बिराजदार, बसवराज परमशेट्टी, राजशेखर दोशी, बसवराज हौदे, शंकर भांजी, भीमाशंकर अंदेनी, दौलप्पा हौदे, सैदप्प झळकी, मल्लिनाथ मातोळी, अनंत कासार, काशिनाथ गाडी, रेवणप्पा माशाळ, जगन्नाथ जाधव, शेवू राठोड उपस्थित होते.



# आ. आवताडे यांच्या मार्गदर्शनात अबॅकस यशवंतांचा गौरव सोहळा

## डॉ. वृषाली पाटील यांच्यावतीने सत्कार

**सुराज्य/पंढरपूर**

आमदार समाधान अवताडे यांच्या मार्गदर्शनात व डॉ.वृषाली पाटील यांच्या सौजन्याने अनघा प्रो ऍक्टिव्ह अबॅकस सोलापूर येथे झालेल्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार झाला.

भाजप महिला मोर्चा अध्यक्षा डॉ. प्राजक्ता बेणारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला विवेक पूर्व, प्राथमिक विद्यालयाच्या संचालिका आशा जमदाडे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. डॉ. वृषाली पाटील, ज्योती जोशी, जयश्री क्षीरसागर, अपर्णा तारखे, सुप्रिया काकडे ,रोहिणी करस्तुरे, तसेच अनघा प्रो ऍक्टिव्ह अबॅकसच्या संचालिका सरिता मुढे मंचावर उपस्थित होते

यशस्वी विद्यार्थ्यांना आ. समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनात विशेष पारितोषिक आणि ट्रॉफी देऊन गौरवण्यात आले. अबॅकस स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये चाणक्यपणा वाढतो तसेच गणित सोडवण्याची विद्यार्थ्यांची क्षमता देखील वाढते त्यामुळेच अनघा प्रो ऍक्टिव्ह अबॅकस सेंटरच्या काम कौतुकास्पद आहे असे कौतुकोद्गार प्रमुख पाहुणे आशा जमदाडे यांनी काढले. अध्यक्षीय भाषणात डॉ.प्राजक्ता बेणारे यांनी विद्यार्थ्यांना टीव्ही व मोबाईल वापरण्यामुळे होणारे फायदे तोटे सांगितले.

मंचावरील इतर मान्यवरांनी देखील मनोगत व्यक्त करताना अनघा अबॅकस सेंटरचे कौतुक केले

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सारिका मुढे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय भोसले मॅडम यांनी करून दिला.

अनघा प्रो ऍक्टिव्ह अबॅकस सेंटरला आमदार समाधान आवताडे हे वेळो वेळी मार्गदर्शन करत असतात त्यांच्या मार्गदर्शनातच हा उपक्रम राबवला असून अशा उपक्रमातून अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जडणघडणीत मोलाची भर पडते.

आमदार समाधान दादा अवताडे यांचे अशा कार्यक्रमाला नेहमीच सहकार्य असते त्यामुळे आमदार समाधान आवताडे यांच्यासह उपस्थित सर्व मान्यवर तसेच पालकांचे संचालिका सरिता मुढे यांनी शेवटी आभार मानले.

# पंढरी सायक्लोथॉन स्पर्धेत २५०० स्पर्धकांनी घेतला सहभाग

**सुराज्य/पंढरपूर**

आम्ही पंढरपूरकर फाऊंडेशन व जिल्हा सायकल असोसिएशन ऑफ सोलापूर यांचे संयुक्त विद्यमाने रविवार दि. २५ फेब्रुवारी रोजी पंढरीत आयोजित सायक्लोथॉन स्पर्धेत २५०० जणांनी सहभाग घेतला.

श्रीविठ्ठल साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील व जिल्हा सायकल असोसिएशन ऑफ सोलापूरचे अध्यक्ष प्रतापसिंह कांचन पाटील यांच्याहस्ते हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ झाला. छत्रपती शिवाजी महाराज चौकातून निघालेली ही सायक्लोथॉन स्टेशन रोड मार्गे प्रबोधनकार ठाकरे चौक, लिंकरोड मार्गे क्रांतीसिंह नाना पाटील चौक, इंदिरा गांधी चौक, अर्बन बँक चौक, भादुले चौक ते पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौक अशा पध्दतीने झाली.

अभिजीत पाटील यांनीही सायकल चालवून उत्सफुर्तपणे सहभाग घेतला होता. छत्रपती शिवाजी महाराज चौकात संगीताच्या तालावर नृत्य करत विद्यार्थी व तरुणांनी ठेका धरला तेव्हा अभिजीत पाटील यांनीही त्यांच्यासोबत मनसोक्त नृत्य



केले. अबाल वृध्दांमध्ये सायकलची आवड निर्माण व्हावी तसेच प्रदुषणमुक्तिसह इंधन बचत होणेसाठी यासाठी आम्ही पंढरपूरकर फाऊंडेशन व जिल्हा सायकलींग असोसिएशन ऑफ सोलापूरच्यावतीने होणारी ही सायक्लोथॉन आनंदाची पर्वणी असल्याचे मत पाटील यांनी व्यक्त केले. यावेळी आम्ही पंढरपूरकर फाऊंडेशनचे अध्यक्ष सागर कदम यांच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी सहभागी स्पर्धकांना व स्वयंसेवकांना मोफत टीशर्ट, प्रमाणपत्र देण्यात आले. खाऊ वाटपही केला. सायक्लोथॉनमध्ये स्वेरी इंजिनिअरींग कॉलेज, गोपाळपूरचे प्रा.यशपाल खेडकर यांसह या संस्थेतील दीडशे विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून भुमिका बजावली. जिल्हा सायकल असोसिएशन ऑफ सोलापूरचे अध्यक्ष प्रतापसिंह कांचन पाटील, राष्ट्रवादी शहराध्यक्ष दिगंबर सुडके, काँग्रेसचे शहराध्यक्ष अमर सुर्यवंशी, विवेक परदेशी, धनंजय कोताळकर, ॲड.अमोल नागटिळक, महेश भोसले, विकास शेळके, समीर कोळी आदींची प्रमुख उपस्थिती होती. सागर कदम, विश्वस्त राधेश बादले-पाटील, दिगंबर भोसले, सतीश माने,गणेश थिटे, शेखर भोसले, विठ्ठल भुमकर, निलेश कदम, नवनाथ बाबर, गणेश निंबाळकर, स्वप्नील साठे, गणेश जाधव, सोमनाथ शिंदे, सिध्दार्थ गुरव, ओंकार चव्हाण, विजय पाटील, विशाल शेळके, युवराज कदम, बिपीन देवमारे, जितु काळे आदींनी परिश्रम घेतले.

## गुरु रविदास विश्व महापीठातर्फे

# संत रविदास महाराज यांची महिलांकडून महाआरती

**सुराज्य/सोलापूर**

शंभर साडया परिधान केलेल्या, डोईवरती फेटा बांधलेल्या, हातामध्ये नारळ व कापूर घेतलेल्या समाजातील महिलांनी समाजाचे आराध्य दैवत संत रविदास महाराज यांची महाआरती केली.

श्री गुरु रविदास महापीठ, भारत शहर व जिल्हा शाखा सोलापूर व अशोक लांबतुरे प्रतिष्ठान सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने संत रविदास मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळ, सोलापूर यांच्या वतीने संत रविदास महाराजांची जयंती सात रस्ता येथे साजरी करण्यात आली.

शनिवारी रात्री ८ वाजता राज्याचे




माजी राज्यमंत्री दिलीप कांबळे, यांच्या हस्ते संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी राष्ट्रीय महामंत्री, सुरेखा लांबतुरे ह्या होत्या. याचवेळेस नान्नज येथील दत्तात्रय विभूते, केंगाव येथील पोलीस ट्रेनिंग स्कूलचे प्राचार्य भारत जाधव, माजी सचिव हरिदास टोणपे हे ही उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दिलीप कांबळे यांचा सत्कार मंडळाचे अध्यक्ष रविकांत कांबळे यांच्या हस्ते करण्यात आला. तर विशेष सत्कार राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांचे प्रशासकिय सल्लागार व नान्नज, उत्तर सोलापूर चे सुपुत्र दत्तात्रय विभुत यांचा सत्कार दिलीप कांबळे यांच्या हस्ते करण्यात आला. माजी सचिव हरिदास टोणपे यांचाही सत्कार मंडळाचे कार्याध्यक्ष मयूर बनसोडे यांच्या हस्ते झाला.

प्रास्ताविक संत रोहिदास मंडळाचे अध्यक्ष रविकांत कांबळे यांनी संत रविदास महाराज जयंती साजरी करण्यामागे भूमिका विशद केली तर माजी नगरसेविका संगीता जाधव यांनी संत रोहिदास महाराजबद्दल विचार व्यक्त केले. शुक्रवार संध्याकाळी उपप्राचार्य पोलीस ट्रेनिंग सेंटर केगांव येथील भारत राऊत यांच्या हस्ते संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली.

दिलीप कांबळे, भारत राऊत, दत्तात्रय विभुते, हरिदास टोणपे, सुरेखा लांबतुरे यांचीही समोचित भाषणे यावेळी झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जयश्री सप्ताळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मेजर वसंत सप्ताळे यांनी मानले.कार्यक्रमास मंडळाचे आधारस्तंभ अशोक लांबतुरे, प्रदेश महामंत्री मधुकर गवळी, बाळकृष्ण सोनवणे, रवि होनकुळे, प्रविण इरकशेट्टी ईस्माईल व्हनसुरे, संतोष कबाडे, विजय खरवळे, किरण व्हनकोरे, अमोल दळवी, कृष्णा काळे, बाळु सुरवसे, विवेक कांबळे, पंकज लांबतुरे, हणमंतु गाडे, अविनाश चाबुकस्वार उपस्थित होते.

# जानकरांची उमेदवारीवर भाजपा चिडीचूप

## भूमिका कोणती घ्यायची याबाबत नेत्यांमध्येच संदिग्धता

✔ सुराज्य/सोलापूर

**सोलापूर लोकसभेसाठी भाजपाच्यावीने अकलूजकर मोहिते-पाटील यांचे कडवे विरोधक आणि नेते उत्तम जानकर यांचे नाव समोर आले आहे. तथापि, जानकर यांच्या समोर आलेल्या संभाव्य उमदेवारीवर सोलापूर लोकसभेच्या भाजपा गोटात अब शांती शांती... असे वातावरण आहे. उमेदवारीवरुन प्रतिक्रिया न देण्याची**



एसटी प्रवर्गासाठी आरक्षीत सोलापूर लोकसभेच्या उमेदवारीसाठी भाजपाकडून लढण्याला साडे दीड डझन इच्छुक आहेत. इच्छुकांची यादी तशी लांबलचक आहे. येथील उमेदवारीसंबंधी भाजपासमोरदेखील मोठा पेच आहे. तरीपण या मतदार संघामधील साधारण चार लाखांहून अधिक धनगर समाजाची व्होट बँक, चळवळमधील आक्रम चेहरा, धनगर समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न आणि अन्य काही कारणे पाहता उत्तम जानकर यांच्या नावाची चाचपणी करुन त्यांना सोलापूर लोकसभेसाठी काम सुरु करण्याचे फर्मान प्रदेश भाजपाच्या वरिष्ठांनी काही दिवसांपूर्वी दिली आहे.

पक्षाच्या वजनदार वरिष्ठ नेतेमंडळींचे आदेश लक्षात घेऊन जानकर यांनी सोलापूर लोकसभेच्या पाच तालुक्यात काम चालू केले आहे. येथील आमदार, माजी आमदार, पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, पुढारी यांच्या गाठीभेटी घेऊन आपणास निवडणुकीत मदत करण्याबद्दल विनंती करीत आहेत.

तथापि, उत्तम जानकरांच्या संभाव्य उमेदवारी संदर्भात स्थानिक भाजपाचा कानोसा घेतला असता त्यांची उमेदवारी स्थानिक भाजपावाल्यांनी तितकीशी पसंद नसल्याचे दिसते. विशेषत्वे, त्यांची या मतदार संघात उमेदवारी निश्‍चित होईल, याचा कसलाच भरोसा वाटत नाही, असेही काही जणांना वाटते.

### भाजपा शहराध्यक्ष म्हणताहेत अजून वेळ आहे

सोलापूर लोकसभेच्या उमेदवारीसंदर्भात उत्तम जानकर यांच्याबद्दल सोलापूर शहर भाजपा अध्यक्ष नरेंद्र काळे यांना विचारले तेव्हा त्यांनी बोलणे टाळले. उमेदवारीच्या निर्णयाला अजून वेळ आहे, असे ते म्हणाले. भाजपा जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची प्रतिक्रिया घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा संपर्क झाला नाही.

उमेदवारीसंदर्भात पक्षाचा काही भरोसा सांगता येत नाही, चर्चेमधील नाव बाजूला सारुन तिसरेच नाव उमेदवारीसाठी फायनल होते असेही या पक्षातील अनेकांचे मत आहे.

मात्र, सोलापूर लोकसभेसाठी काँग्रेसच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे यांच्या विरोधात तुल्यबळ उमेदवार द्यावा, असेच अनेकांना वाटते.

उत्तम जानकर हे प्रणिती शिंदे यांच्या विरोधात कडवी फाईट देतील असे वाटत नाही. प्रणिती शिंदेंच्या विरुद्ध जानकर हा लोकसभेसाठी चेहराच होऊ शकत नाही, असेही म्हणणारे आहेत.

### उपरा उमेदवार कशाला? मैं हू ना : ॲड. शरद बनसोडे

✔ **सोलापूर** : सोलापूर लोकसभेसाठी एसटी जात प्रगर्वाचा भाजपाकडे स्थानिक सक्षम उमेदवार नाही असे कसे होईल.? मी सक्षम उमेदवार आहेच ना. या मतदार संघात उपरा उमेदवार आणण्याची गरजच नसावी. आमचा काय विसर पडलाय का? आम्ही काय सक्षम नाही का? असे सवाल उपस्थित करीत माजी खासदार ॲड. शरद बनसोडे यांनी सोलापूर लोकसभेच्या उमेदवारीच्या रिंगणात आपली टोपी टाकली. मुख्य इमारतीचे बदलेले रुप पाहण्याच्या निमित्ताने ते महापालिकेत आले होते. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. लोकसभा लढण्यासाठी सक्षम उमेदवार म्हणून आपण इच्छूक आहोत, असे त्यांनी ठासून सांगितले. ते म्हणाले की, सोलापूर लोकसभेची निवडणूक लढण्यासाठी मी सक्षम आहे, हे पार्टीला माहिती आहे. गेल्या खेपेसदेखील उमेदवारीसाठी प्रयत्न केला होता. मात्र, पार्टीला काही वेगळा प्रयोग करायचा असेल म्हणून तसा प्रयत्न झाला. तथापि, भाजपाकडून आपल्यावर कोणताही अन्याय झालेली नाही. पार्टीला मी सांगितले आहे. स्थानिक उमेदवार नसेल तरी मी लढण्यासाठी तयार आहे. उपरा उमेदवार नको. मतदार संघातील ५६० गावांमध्ये माझा आजही संपर्क आहे. नगरपरिषदा, महापालिका या संदर्भात सगळे माहिती आहे. दोन वेळा निवडणूक लढविल्याने अनुभव आणि माहिती आहे. आमच्या काही चुका झाल्या असतील त्या नक्की दुरूस्त करू. काही विकास कामे राहिली असतील तर तीपण पूर्ण करु.

## संक्षिप्त वृत्त




### वीर सावरकर मैदानात ब्राह्मण महासंघाचे कार्य सुरू

✔ **पंढरपूर** : स्वातंत्र्यवीर सावरकर मैदान,बसथांबा असणारे सोलापूरमधील मोक्याचे ठिकाण. त्याच जागेत सावरकर पुण्यतिथी निमित्ताने फलक लावून ते वीर सावरकर मैदान नाव पुन्हा चालू करण्यासाठी ब्राह्मण महासंघाने आग्रही भूमिका घेतली आहे.शिवस्मारक येथे दि. २५ फेब्रुवारी रोजी मेळावा घेऊन ब्राह्मण महासंघाचे पदाधिकारी नियुक्ती करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष अनिल कुलकर्णी,जिल्हा सरचिटणीस पदी अमोल कुलकर्णी खर्डीकर)शहराध्यक्ष विवेक देशपांडे, प्रांजली हिंगे,कीर्ती देशपांडे, वकील आघाडी साठी माधुरी देशपांडे,जिल्हा युवक आघाडीसाठी अमृता बडवे,यांच्या नियुक्ती केल्या. बार्शी पदाधिकारी निवडी केल्या. ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष आनंद दवे,चैतन्य जोशी आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. उद्योग,व्यापार,पतसंस्था कार्याचा आढावा प्रदेश अध्यक्ष प्रवीण शिरसिकर यांनी घेतला. यावेळी श्रद्धा अध्यापक,प्रेमलता वैद्य,दिनकर सापनाईकर ,परिणीता कुलकर्णी, आरती फडके,उर्मिला जहागीरदार, पौर्णिमा कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन कीर्ती देशपांडे यांनी केले. आभार मधुरा वडापुरकर यांनी मानले.

### बनावट कागदपत्र प्रकरणी कारवाईसाठी ११ मार्चला उपोषण

सोलापूर : कस्तुरबाई साखरे यांनी काढलेल्या जात प्रमाणपत्र प्रकरणाची चौकशी करून तत्काळ कारवाई करावी. या मागणीसाठी सोमवार दि. ११ मार्च २०२४ रोजी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय समोर आमरण उपोषण करण्यात येणार




असल्याची माहिती अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती शेतकरी विभागाचे कार्याध्यक्ष पंचाक्षरी चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली. धाराशिव जिल्ह्यातील लोहारा तालुक्यातील मौजे जेवळी येथील कस्तुरबाई साखरे यांनी मौजे किरनळी तालुका अक्कलकोट येथील रहिवासी असल्याचे कागदपत्र सादर करून संगणमताने बनावट कागदपत्राच्या आधारे जात प्रमाणपत्र काढले. या जात प्रमाणपत्राच्या आधाराने त्यांनी सन २०२४ मध्ये सरपंच पदाची निवडणूक लढविली. मूळतः जात वेगळी असतानाही बनावट कागदपत्राद्वारे जात प्रमाणपत्र काढण्यात आल्याचा आरोप यावेळी पंचाक्षरी चव्हाण यांनी केला. याप्रकरणी तत्काळ चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी या मागणीचे निवेदन देऊनही कार्यवाही न झाल्याने येत्या ११ मार्च रोजी पासून आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे पंचाक्षरी चव्हाण यांनी यावेळी सांगितले. या पत्रकार परिषदेस ताराचंद राठोड , लक्ष्मण आडे, अमोल केवटे, विवेक चव्हाण आदी उपस्थित होते.

# अप्पर जिल्हाधिकारी गझलेत ठरल्या अव्वल

## सांस्कृतिक महोत्सव प्रथमच महिला अधिकाऱ्याने गाजवला

✔ सुराज्य/सोलापूर

टेबलावर फायलींचा खच, भेटून गाऱ्हाणी मांडणारे नागरिक आणि वरिष्ठांसमोर होणारी कसरत अशा कार्यपद्धतीत वावरणाऱ्या अधिकाऱ्यांना आपली कला जपणे तितकेच कठीण जाते. मात्र सोलापुरात बदलून आलेल्या अप्पर जिल्हाधिकारी ठाकूर यांनी आपले गझल प्रेम राखून ठेवले आहे. त्यांनी आपल्या गझल द्वारे सांस्कृतिक महोत्सव गाजवला आहे.

अप्पर जिल्हाधिकारी या गझलेमध्ये अव्वल ठरल्या आहेत. प्रशाकिय अधिकारी आणि सरकारी बाबूचा थाट वेगळाच असतो. टिपिकल पद्धतीने कार्य करण्याची अधिकाऱ्यांची पद्धत. मात्र याला सोलापूरातील एक महिला अधिकारी अपवाद ठरल्या आहेत. आपली कर्तव्य बजावत असताना देखील कला आत्मसात करून अधिकाऱ्यांतील कलाकार त्यांनी जिवंत ठेवला आहे. त्या महिला अधिकाऱ्याचे नाव आहे. अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर. अप्पर जिल्हाधिकारी पदाचा पदभार घेतलेल्या मोनिका सिंह ठाकूर या क्रिडाप्रेमी तर आहेत. त्याचबरोबर या गजल गायक आहेत. त्यांचे हिंदीभाषावर मोठे प्रभुत्व आहे. त्याप्रमाणे त्यांचे गजलावर मोठे प्रेम आहे. त्यांच्या गजलाचे अनेक कार्यक्रम झाले आहेत. ज्या ठिकाणी त्या जातात त्या ठिकाणी आपल्या कला सादर करत वेगळा ठसा उमटवतात. जिल्हा प्रशासनाचे शहरात तीन दिवस सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवात स्थानिक कलाकार आणि इतर राज्यातील कलाकारांनी कला सादर केली. मात्र सोलापूरचा महोत्सव



बेखुदी में कह दे उसको... जो भी कहना है तुझे... बेखुदी में कह दे... उसको जो भी कहना है तुझे... दिल अगर कमजोर है.... रिश्तो का धागा सौच मत... वो अगर अच्छा लगे तो.... उसका इरादा सोच मत ... अगर ओ अच्छा लगे तो.... उसका इरादा सोच मत.... ये तो रिश्तों का नतीजा हे सोच मत... एक दिन डुबना है सबको... डुबने का खौप मे सोचना, बचना सभलना सोच मत अशा एका सारख्या एक गझल सादर करत या महिला अधिकाऱ्यांनी आपल्या कलेची अदाकरा सादर केली.

गाजवला तो अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांच्या गझल गायनाने. यापूर्वी सोलापूर शहरामध्ये आपल्याला गझल सादर करण्यासाठी कुणीही आमंत्रित केले नाही, मात्र आता अप्पर जिल्हाधिकारी पदाचा पदभार घेतल्यानंतर आपल्याला ही संधी मिळाली. त्या संधी मिळाल्याचे सांगत सोलापूरच्या सांस्कृतिक महोत्सवांमध्ये अनेक गझल गात प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

यापूर्वी तत्कालीन अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे हे उत्तम गायक होते. तर दक्षिण सोलापूरचे तहसीलदार कुंभार हे देखील गायक होते तसेच त्यांनी अनेक कार्यक्रमांमध्ये आपली ही गाण्याची कला सादर केली होती. आता थेट अप्पर जिल्हाधिकारी मोनाका सिंह ठाकुर यांनी थेट व्यसपिठावरून गझल सादर केल्यामुळे अधिकाऱ्यांमध्ये सुद्धा कलाकार लपलेला असतो असे म्हणावे लागेल.

# जिल्ह्यात ५६ हजार ३०६ नोंदी सापडल्या; २ हजार ७८८ कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यात २१ फेब्रुवारीपर्यंत ५६ हजार ३०६ नोंदी आढळून आल्या आहेत. आढळून आलेल्या नोंदींमध्ये मराठी मध्ये ७ हजार ९१८, मोडी लिपीत ४८ हजार ३८५, इतर भाषेत ३ आढळून आले आहेत. त्यापैकी २ हजार ७८८ प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले आहे अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी दिली.

राज्यात कुणबी मराठा नोंदी पडताळणी होत आहे. त्याचे अपडेट दर आठवड्याला प्रत्येक जिल्हा प्रशासनाकडून राज्य सरकारच्या संबंधित यंत्रणेकडे अहवाल पाठवला जात आहे. सोलापूर जिल्ह्यातही शासनाच्या सर्व निकषानुसार कुणबी तपासणी नोंदींचे काम सुरू आहे. आज तागायत ९, २०५, ४०८ इतक्या नोंदी तपासल्या आहेत.

**मराठी ७ हजार ९१८, मोडी ४८ हजार ३८५, इतर ३**

सध्या मराठी भाषांतर केलेल्या नोंदीमध्ये मोडीतील ४० हजार ११४, शिल्लक नोंदी ८ हजार २७४, स्कॅनिंग पूर्ण झालेल्या नोंदी ४६ हजार ४५९, स्कॅनिंग शिल्लक ९ हजार ८४७, जिल्हा वेबसाईडवर ३४ हजार ३६५ इतक्या नोंदी अपलोड केलेल्या आहेत. तर २१ हजार ९४१ नोंदी अपलोड करायच्या असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

जिल्ह्यात कुणबी, मराठा कुणबी व कुणबी मराठा अशा ५६ हजार ३०६ नोंदी आढळून आल्या आहेत. २४ ऑक्टोबर २०२३ ते आजतागायत जिल्ह्यातील २८७० जणांनी कुणबी प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केले आहेत. यातील २ हजार ७८८ जात प्रमाणपत्र निर्गमित केली आहेत. तर यातील १३ अर्ज नामंजूर आणि ६९ अर्ज प्रलंबित आहेत.

राज्यभर सन १९६७ पूर्वीच्या नोंदी तपासल्या जात आहेत. या नोंदी तपासताना जवळपास १३ प्रकारची कागदपत्रे विचारात घेतली आहेत. यामध्ये शाळा सोडल्याचा दाखला, सातबारा व ८ अ चा उतारा, जन्म मृत्यूच्या नोंदी, खरेदी - विक्री दस्त, कढई पत्रक, ग्रामपंचायत व महसूल दप्तरी असलेला खसरा पत्रक, पाहणी पत्रक, कुळ नोंदवही, हक्क नोंदणी, पोलीस विभागातील गुन्हा दप्तरी नोंद, हक्क नोंदणी, रेल्वे पोलीस विभागातील गुन्हा दप्तरी नोंद, शेतवार तक्ता आदींचा समावेश आहे. त्याचबरोबर विविध संस्थानचे रेकॉर्ड देखील विचारात घेतले आहे. सद्या महाराष्ट्र राज्यात कुणबी मराठा नोंदी (कुणबी मराठा रेकॉर्डस्) शोधण्याची सरकार दरबारी जोरदार मोहीम चालू आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळावे आणि त्यांना ओबीसी वर्गातून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवली सराटी येथून साखळी उपोषण आंदोलन करून त्याची सरकारला दखल घेण्यास भाग पाडले. याच मराठा आरक्षण चळवळींमधून मागील गेल्या काही दिवसापासून प्रत्येक जिल्ह्यात गावनिहाय कुणबी नोंदी शोध मोहीम चालू आहे. मोडी लिपींत असलेल्या जुन्या नोंदी तपासून त्या नव्याने स्कॅन करून त्याची गाव जिल्हानिहाय ऑनलाइन माहिती महाराष्ट्र सरकारने सर्व सामान्य जनतेसाठी उपलब्ध करून दिली आहे. सोलापूर जिल्ह्यातील ११ तालुके आणि विविध संस्थानातून ९ लाखाच्या पुढे दप्तरे तपासली आहेत.



# हिट अँड रन कायदा रद्द चालकांचा मिठाई वाटून जल्लोष

✔ **सोलापूर** : वाहतूक संघटना संयुक्त महासंघ प्रदेशाध्यक्ष रियाज सय्यद यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून चालकांना मिठाई भरून जल्लोष करण्यात आला


हिट अँड रन कायद्यात चालकांना सात वर्षे सक्त मजुरी आणि दहा लाख रुपयाचा दंड असल्यामुळे महाराष्ट्रात सर्वप्रथम महासंघाने हिट अँड रन विरोधात विरोधाची मशाल पेटवली ही मशाल संपूर्ण देशभर पसरली होती यासाठीच याला खूप विरोध होत होता महाराष्ट्र,राज्यस्थान, मध्यप्रदेश, कर्नाटक विविध राज्यात अनेक ठिकाणी याचे पडसाद पहायला मिळाले आणि चालक आणि वाहतूक संघटना संयुक्त महासंघाने चक्का जाम आणि आंदोलन करून विरोध दाखवला होता त्यामुळेच शेवटी हा कायद्या रद्द करण्यात आला

यावेळी वाहतूक संघटना संयुक्त महासंघ प्रदेश रियाज सय्यद, यासीन मुल्ला, रियाज कुमठे, हमीद बागवान, मुश्तक मैलार, परसराम बगले, रिजवान शेख, मोहसिन मुल्ला, महेबूब शेख, इरफ़ान शेख, प्रदीप शिंगे, खलील कोरबू, सद्दाम शेख, इरफान कल्याणी, रमेश बनसोडे, मिनाज बागवान,शंकर राउत, मौला मकानदार, सलीम पठान, अयूब शेखसह आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षणाधिकारी अंधारे आणि फडके यांची बदली

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला लागलेले ग्रहण अखेर तडका फडकी झालेल्या बदल्यान संपुष्टात आले. त्याचे झाले असे की प्राथमिक शिक्षण विभागाच्या प्रभारी शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांची प्रमोशनने लातूरला बदली झाली त्यांच्या जागेवर तब्बल दीड वर्षानंतर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाला पूर्णवेळ शिक्षणाधिकारी मिळाला आहे.



यापूर्वी सोलापूर महापालिकेतील प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये प्रशासन अधिकारी म्हणून कामकाज केलेले आदर्श यांची जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली होती.

तर माध्यमिक शिक्षण विभागात ही बदल झाला असून विद्यमान शिक्षणाधिकारी फडके यांची अखेर शासनाने बदली केली आहे त्यांच्या जागेवर माध्यमिक शिक्षण अधिकारीपदी सचिन जगताप यांची नियुक्ती केली आहे. सचिन जगताप हे वर्धा जिल्ह्यातून सोलापूरला येत आहेत तर शेख हे यापूर्वी गोंदिया जिल्ह्यात माध्यमिक शिक्षणाधिकारी होते.

# राष्ट्रवादीच्या बालेकिल्ल्याला भाजपाचे सुरुंगच सुरुंग! आता ‘कमळ’ हातात घेण्याशिवाय राहिले कोण?

## बागल गटाच्याही गळ्यात बीजेपीचे उपरणे, तालुक्यातील बदलणार राजकीय समीकरणे

✔ सुराज्य/खास प्रतिनिधी

कधी काळापर्यंत महाराष्ट्रात राजकारणाचा वेगळं वलय राहिलेल्या सोलापूर जिल्ह्यात भाजपाचे वादळ अधिक वेगाने घोंगावताना दिसत आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या बालेकिल्ल्यात भाजपाला ’और अच्छे दिन’ राहात आहेत, अशीच परिस्थिती असल्याचे दिसत आहे. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादीची पीछेहाट होऊन भाजपाचे ’कमल’ खिले परिस्थिती अधिकच निर्माण होत आहे. जिल्ह्यातील उरल्या सुरलेल्या करमाळा तालुक्याला देखील भाजपाने राजकीय सुरुंग लावला आहे. या तालुक्यातील बडे प्रस्थ बागल गट हासुध्दा भाजपात प्रवेश करत आहे. त्यातून या जिल्ह्यात भाजपाची ताकद अधिक वाढत असल्याचे वास्तव चित्र आहे. या तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलणार आहेत.

राज्याचे मुख्यमंत्रीपद आणि उपमुख्यमंत्री पद एकाच वेळी भोगलेल्या सोलापूर जिल्ह्याचा राजकिय पोत हा वेगळा आहे. या तांलुक्यात कधीं नव्हे एवढी राजकिय स्थित्यंतरे अलीकडच्या काळात घडली आहेत. राष्ट्रवादीचा बालेकिल्ला त्याहूनही शरद पवारांचा लाडका जिल्हा असलेल्या या जिल्ह्यात मागच्या काही वर्षात राष्ट्रवादीच्या राष्ट्रवादीच्या घड्याळाचा गजर जोरात होता. मात्र राजकिय उलथापालती झाल्या यामध्ये सोलापूर जिल्ह्यात भाजपाची सुसाट एक्सप्रेस सुटली. तदनंतर राज्यात झालेल्या राजकीय भूकंपाच्या ठिकऱ्या या जिल्ह्यात पसरल्या. राजकीय समीकरणे बदलली. फाटाफूट झाली.



त्याचीच परिणीती करमाळ्याचा बागल गट भाजपाच्या वळचणीला जात आहे.

वास्तविक पाहता या गटाला स्वर्गीय माजी आमदार दिगंबर बागल यांच्या नंतर ज्येष्ठ नेते शरद पवार तसेच अजित पवार शिवाय माजी मंत्री प्रतापसिंह मोहिते पाटील यांनी ताकद दिली. त्यावर बागल गट हा आपले अस्तित्व अबाधित ठेवू शकला.

मध्यंतरीच्या काळामध्ये मंत्री प्रा. तानाजी सावंत यांच्या मदतीने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडूनही या गटाला नाही म्हटले तरी सहकार्य झाले. या तालुक्यातील बागल यांच्या मार्गदर्शनाखाली असलेल्या कारखान्याची धुराडी पेटली. या गटाला आपलं राजकिय अस्तित्व कायमस्वरूपी अबाधित ठेवण्यासाठी सत्तेतील मोठ्या पक्षाची ताकद हवी होती. तालुक्याचे राजकारण करत असताना गॉडफादर यांचा हात पाठीवरती हवा होता. राजकारण आणि समाजकारण खास करून सहकार क्षेत्राचे वलय कायम ठेवण्यासाठी मोठी दृश्य आणि अदृश्य शक्ती हवी होती, सगळ्या आघाड्यांचा विचार करता बागल गटाने सामर्थ्यवान भाजपाची ताकद पाठीशी घेण्याचे ठरवून या पक्षात प्रवेश करण्याचे निश्चित केल्याचे दिसते. त्यानुसार, या गटाचा भाजपात प्रवेश होत आहे. बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल-कोलते यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली या गटाचा भाजपात प्रवेश होत आहे. मोठी ऊर्जा मिळणार असल्याचे मानले जात आहे.

### बागल गटाबद्दल काही...

बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल व दिग्विजय बागल यांचे वडील दिवंगत दिगंबरराव बागल यांनी १९९५ व १९९९ असे दोन वेळा करमाळा विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले व ते राज्यमंत्री देखील होते.दिगंबरराव बागल यांचा माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी पराभव केला. त्यानंतर ५ फेब्रुवारी २००५ रोजी दिगंबरराव बागल यांचे निधन झाले.

रश्मी बागल व दिग्विजय बागल यांच्या आई २००९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस कडून आमदार होत्या. त्यानंतर २०१४ ला राष्ट्रवादी कडून करमाळा विधानसभा लढवत असताना रश्मी बागल यांचा पराभव झाला. त्यानंतर बागल गटाच्या नेत्या रश्मी बागल यांनी २०१९ ला आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई येथे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला आणि शिवसेनेकडून करमाळा विधानसभेची निवडणूक लढवली होती. या निवडणुकीतही त्यांचा पराभव झाला.